# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, यशवंत नगर, विरार (प.)

**मा. सर्वसाधारण सभा**

**मा.सर्वसाधारण सभा सूचना क्र. ०९**

**दि.१२/०६/२०२६**

प्रति,

मा. श्री / श्रीमती .........................................,

नगरसेवक / नगरसेविका,

वसई-विरार शहर महानगरपालिका

महोदय / महोदया,

या सूचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, वसई-विरार शहर महानगरपालिकेची मा.सर्वसाधारण सभा सोमवार, दि.२२/०६/२०२६ रोजी दुपारी ०३:०० वाजता 'सर्वसाधारण सभागृह', ४ था मजला, वसई-विरार शहर महानगरपालिका, मुख्यालय, यशवंत नगर, विरार (प.) येथे खालील विषयांवर विचार विनिमय करून निर्णय घेणेसाठी आयोजित करण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेस कृपया उपस्थित रहावे, हि विनंती.

**मा.सर्वसाधारण सभेची विषय पत्रिका**

१. मागील दि.२२/०५/२०२६ रोजीच्या मा.सर्वसाधारण सभेचे कायम केलेले इतिवृत्त माहितीस्तव.

२. प्रश्नोत्तरे.

३. शासकीय पत्र व्यवहार माहितीस्तव.

४. श्री.जयेंद्र नारायण पाटील, सफाई कामगार यांच्या स्वेच्छा सेवानिवृत्तीबाबत.

५. श्री. हरिदास जयराम म्हात्रे, सफाई कामगार यांच्या स्वेच्छा सेवा निवृत्तीबाबत.

६. कु. जुहिली विनोद सातघरे यांना लाड समिती शिफारसी नुसार महानगरपालिका सेवेत 'लिपिक टंकलेखक' या पदावर सामावून घेणेबाबत.

७. महानगरपालिका कार्यक्षेत्रातील रहदारी व वाहतुक नियंत्रणाकरीता बसविणेत आलेल्या सिग्नल यंत्रणांची १ (एक) वर्षाकरिता साहित्यासह देखभाल दुरुस्ती करणेकामास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

८. सन २०२५-२६ ह्या वर्षात जिल्हा वार्षिक योजना नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत कामांना प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

९. सन २०२६ ते २०२७ या वित्तिय वर्षाकरीता वसई-विरार शहर महानगरपालिकेसाठी सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा यांचे कडील २०७ पैकी १५७ सुरक्षा रक्षकांची पुर्ननियुक्ती करणेकामी येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

१०.वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (जी) कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. १०५ मध्ये नायगाव पूर्व जुचंद्र येथील नायगाव बापाणे रस्त्यावर ५ ठिकाणी बॉक्स कल्वर्ट बांधणे या कामास सुधारीत प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

११.जनगणणा-२०२७ च्या कामकाजाकरिता खर्चास प्रशासकीय व वित्तिय मंजूरी मिळणेबाबत.

१२.सन २०२६-२७, सन २०२७-२८ व सन २०२८-२९ या त्रैवार्षीक वर्षाकरीता वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात "शहर सौदर्याकरण व स्वच्छता स्पर्धा २०२२" अंतर्गत शहर सौदर्याकरण करण्यात

आलेल्या मध्यवर्ती चौक, शिल्पे, कारंजे, वारसा स्थळे, GVP इ. यांची दैनंदिन दुरुस्ती करणेकामी प्रशासकिय व वित्तीय मान्यता देऊन ई-निविदा कार्यप्रणालीद्वारे बी-२ निविदा दर मागविणेबाबत.

१३.सन २०२६-२७, सन २०२७-२८ व सन २०२८-२९ ह्या त्रैवार्षिक वर्षाकरीता वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या बांधकाम, विद्युत व पाणीपुरवठा विभागामार्फत तसेच मनपाच्या पॅनलवरील तांत्रिक सल्लागारामार्फत तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकाचे शासकिय संस्थेमार्फत, खाजगी कंन्स्लटंट, इंजिनिअर्स ह्यांचेमार्फत तांत्रिक लेखापरिक्षण करुन, प्रमाणित करुन तपासणी अहवाल सादर करणेकामी प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

१४.केंद्र पुरस्कृत Urban Challenge Fund अंतर्गत Public Private Partnership (PPP) तत्त्वावर दोन प्रकल्प राबविण्यासाठी स्वारस्य अभिरुची (EOI) मागविण्यास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

१५.वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "आय" कार्यक्षेत्रातील नायगांव कोळीवाडा येथे जलकुंभ बांधणे कामी तयार केलेल्या अंदाजपत्रकीय खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

१६.वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभागसमिती 'एच' कार्यक्षेत्रातील अंबाडी रोड दिवाणमान येथील स्विमींग पुलमध्ये विविध दुरुस्ती करणेकामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

१७.महानगरपालिकेच्या विविध तदर्थ समित्यांवर उपसभापती पदी निवड होणाऱ्या पदाधिकारी यांना वाहन भत्ता मंजूर करणेबाबत.

१८.वसई-विरार शहर महानगरपलिका कार्यक्षेत्रातील ज्येष्ठ नागरीक संघाना वार्षिक अनुदान देणेबाबतच्या धोरणास/योजनेस मान्यता मिळणेबाबत.

१९.वसई-विरार शहर महानगरपालिका राबवित असलेल्या विविध सामाजिक / सांस्कृतीक कार्यक्रमाकरीता १ एप्रिल ते ऑगस्ट २०२६ पर्यंत कार्यरत कंत्राटदारास मुदतवाढ तथा प्रलंबित देयके व माहे एप्रिल ते ऑगस्ट २०२६ पर्यंत नियोजित कार्यक्रमाकरीता सुधारीत प्रशासकीय / वित्तीय मान्यता तसेच वसई-विरार शहर महानगरपालिका राबवित असलेल्या विविध सामाजिक / सांस्कृतीक कार्यक्रमाकरीता सन २०२६-२७ ते सन २०२७-२८ करीता प्रशासकीय / वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

२०.सन २०२६-२७ या वित्तीय वर्षात महानगरपालिका हद्दीतील सर्व भाषिक शाळेतील (इंग्रजी माध्यम वगळून) शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता महानगरपालिका परिवहन सेवेचा वार्षिक मोफत पास योजनेकरिता महिला व बालकल्याण विभागामार्फत ५० % वित्तीय सहाय्य एस.एन.एन सर्व्हिसेस यांस अदा करणे व याकरिता येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

२१.भूमी अभिलेख कार्यालयाकरिता एक वर्षासाठी महानगरपालिकेचे बोळींज येथील जुने प्रभाग समिती कार्यालयाचा पहिला व दुसरा मजला कार्यालयीन कामाजासाठी भाडे तत्वावर देणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

२२.वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील फेरीवाल्यांकडून वसूल करणेत येणाऱ्या बाजार फी बाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

आपला विशासू,

(विश्वनाथ तळेकर)
महानगरपालिका सचिव
वसई-विरार शहर महानगरपालिका

(मा.महापौर महोदय यांच्या मान्यतेने)

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, यशवंत नगर, विरार (प.)

**मा. सर्वसाधारण सभा पूरक घोषणा**

**मा.सर्वसाधारण सभा सूचना क्र. ०९**

**दि.१८/०६/२०२६**

प्रति,

मा. श्री / श्रीमती .......................................,

नगरसेवक / नगरसेविका,

वसई-विरार शहर महानगरपालिका

महोदय/ महोदया,

या सूचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, दि. २२ जून २०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित सर्वसाधारण सभेची मूळ सूचना व कार्यसूची दि.१२ जून २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ मधील अनुसूची 'डी', प्रकरण दोन – महानगरपालिका, स्थायी समिती, परिवहन समिती इत्यादींचे कामकाज मधील नियम क्र. १(ज) अंतर्गत सभेच्या कामकाजाचे नियमन करण्यासंबंधी असलेल्या तरतुदी तसेच संबंधित नियमांनुसार, सदर सभेच्या कार्यसूचीत खालील अतिरिक्त विषयांचा समावेश करण्यात येत असून त्यांवर सभेत विचार व निर्णय घेण्यात येईल. अनुसूची 'डी' मधील नियमांना अधिनियमाचा भाग मानले जाते.

२३.महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमा मधील तरतूदीनुसार सभा नियमावलीतील 'प्रस्तावाच्या सूचना' अंतर्गत महासभेच्या कामकाजाचे थेट प्रक्षेपण (Live Streaming) पुन्हा सुरू करण्याबाबत.

२४.वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील नालेसफाई कामांची सद्यस्थिती. नाल्यांवरील अतिक्रमणे व संभाव्य पूरस्थितीबाबत तातडीने युद्धस्तरावर कार्यवाही करण्याबाबत.

२५.शहरातील फेरीवाल्यांच्या 'डिजिटल क्यूआर कोड' व बायोमेट्रिक नोंदणीद्वारे कर वसुली पद्धत लागू करण्याबाबतचा प्रस्ताव आगामी महासभेच्या विषय पत्रिकेत समाविष्ट करणेबाबत.

मूळ सूचनेतील इतर सर्व बाबी व कार्यसूची यथावत राहतील.

स्थळ: वसई-विरार शहर महानगरपालिका सभागृह

दिनांक: १८/०६/२०२६

आपला विश्वासू,

(विश्वनाथ तळेकर)

महानगरपालिका सचिव

वसई-विरार शहर महानगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय विरार
### मा.सर्वसाधारण सभा

**सर्वसाधारण सभा ठराव क्र. १** **सभा सुचना क्र. ९** **दिनांक : २२/०६/२०२६**

---

**विषय :- मागील दि. २२/०५/२०२६ रोजीच्या मा. सर्वसाधारण सभेचे कायम केलेले इतिवृत्त माहितीस्तव.**

**ठराव / निर्णय :-** दि.२२/०५/२०२६ रोजीच्या मा. सर्वसाधारण सभेचे कामय केलेल्या इतिवृत्ताचे वाचन करुन दुरुस्तीसह कायम करण्यात आले.

सुचक - प्रफुल्ल साने

अनुमोदक - मनोज पाटील

अनुकूल संख्या --------------- प्रतिकुल संख्या--------------- तटस्थ संख्या -------------------

ठराव/सर्वानुमते/~~बहुमताने~~/मंजूर/~~नामंजूर~~

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

# वसई-विरार शहर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय विरार
## मा.सर्वसाधारण सभा

**सर्वसाधारण सभा ठराव क्र. २** **सभा सुचना क्र. ९** **दिनांक : २२/०६/२०२६**

---

**विषय :- प्रश्नोत्तरे.**

| अ.क्र. | सचिव कार्यालयास प्रश्न प्राप्त दिनांक | सदस्याचे संपूर्ण नाव व प्रभाग क्रमांक | प्रश्नाचे संक्षिप्त स्वरूप |
|---|---|---|---|
| १. | २६/०५/२०२६ | श्रीमती मीरा समिर निकम, प्रभाग क्र.१६-ब | आचोळे आणि तुळींज मार्गावरील विजेच्या खांबांवर मोठ्या प्रमाणात केबल लटकत आहेत. या केबल खूप खालपर्यंत लटकले आहेत तसेच काही ठिकाणी तुटून देखील पडलेले आहे. या तुटलेल्या केबल एखाद्या दुचाकी किंवा चार चाकी मध्ये अडकून अपघात घडू शकतो याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच या केबलच्या अनधिकृत जाळ्यामुळे शहर विद्रुप झालेले आहे. या विजेच्या खांबांवरील टाकलेल्या केबल या कोणाच्या आहेत याचा कोणताही तपशील प्रशासनाकडे उपलब्ध नाही. या केबल टाकणाऱ्या ज्या कंपनीकडून टाकण्यात आल्या आहेत त्यांच्याकडून महानगरपालिकेने कर भाडे आकारले तर महानगरपालिकेकडे महसूल जमा होईल आणि त्यातून सुनियोजित पद्धतीने या केबल टाकण्यासही उपाययोजना करता येतील, विनापरवानगी केबल टाकणाऱ्या कंपन्यांकडून महसूल घेणे अथवा त्या काढून टाकणे आणि या केबल टाकणाऱ्यांवर महानगरपालिकेमार्फत कारवाई करणार का? |
| २. | १३/०६/२०२६ | श्रीमती प्रज्ञा कमलाकर पाटील, प्रभाग क्र.१५-अ | विषय क्र. १ : विकासकामांनंतर रस्त्यांची दुरवस्था व नागरिकांची गैरसोय-<br>शहरात STP, पाणीपुरवठा, गॅस लाईन, ड्रेनेज व इतर विकासकामांमुळे अनेक रस्ते खोदण्यात आले आहेत. मात्र काम पूर्ण झाल्यानंतर रस्त्यांची योग्य पुनर्बांधणी न झाल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. पावसाळा तोंडावर असताना ही परिस्थिती अधिक गंभीर बनली आहे.<br>प्रश्न : १. विकासकामांनंतर खराब झालेल्या रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी कोणती कार्यवाही करण्यात आली आहे?<br>२. संबंधित कंत्राटदार व अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून कोणती कारवाई करण्यात आली आहे?<br>३. शहर खड्डेमुक्त करण्यासाठी प्रशासनाचा कालबद्ध कार्यक्रम काय आहे? |
| ३. | १३/०६/२०२६ | श्रीमती प्रज्ञा कमलाकर पाटील, प्रभाग क्र.१५-अ | विषय क्र. ३ पाणीपुरवठा व्यवस्थेतील त्रुटी -<br>अनेक भागांमध्ये अपुरा व कमी दाबाचा पाणीपुरवठा होत असून नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे.<br>प्रश्नः<br>१. अनियमित पाणीपुरवठ्याच्या तक्रारी दूर करण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली आहे?<br>२.पाणी गळतीमुळे होणारे नुकसान रोखण्यासाठी कोणती उपाययोजना करण्यात आली आहे?<br>३. भविष्यातील गरज लक्षात घेऊन नवीन जलस्रोत विकसित करण्याचा आराखडा काय आहे? |

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | १२/०६/२०२६ | श्रीमती दिपा सुजेश पाटील, प्रभाग क्र.२७-क | १. वसई ते ठाणे परिवहन सेवा सुरू आहे का?<br>२. वसई ते ठाणे परिवहन सेवा पूर्वी केव्हा सुरू होती ?<br>३.वसई ते ठाणे मार्गावर परिवहन सेवा बंध करायची कारणे काय ?<br>४. वसई ते ठाणे परिवहन सेवा केव्हा सुरू करणार ? |
| ५ | १४/०५/२०२६ | श्रीमती अमृता अतुल चोरघे, प्रभाग क्र.४-अ | १.वसई विरार शहर महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये किती इमारतीमध्ये रेनवॉटर हारवेस्टींग सिस्टीम करण्यात आलेली आहे ?<br>२.रेनवॉटर हारवेस्टींग सिस्टीम सक्तीची आहे का? आणि नसेल तर त्याअनुषंगाने काही प्रयोजन किंवा नियोजन आहे काय ?<br>३.आजपर्यंत जर इमारतींमध्ये रेनवॉटर हारवेस्टींग सिस्टीम केलेली नसेल तर का केली नाही आणि त्यासंबंधी शासनाचे काय निर्देश आहेत. आणि त्यानुसार अंमलबजावणी आपल्या शहरात राबविण्यात येते काय ?<br>४.त्याअनुषंगाने कोणत्या प्रकारचे इन्सेंटीव इमारतीला वसई विरार शहर महानगरपालिकेकडून देण्यात येतात ? |

**ठराव / निर्णय :-** सन्मा. सदस्य यांनी कलम ४४ अंतर्गत विचारलेल्या प्रश्नांपैकी वरीलप्रमाणे स्वीकृत केलेल्या प्रश्नांवर सभागृहात सविस्तर चर्चा करणेत येऊन ठेकेदाराने नेमून दिलेली कामे योग्यरित्या करावी व प्रशासनाने यावर लक्ष देणे असे एकमताने ठरविण्यांत आले. दिलेल्या उत्तराबाबत संबंधित सदस्यांना अवगत करणेत आले.

सुचक - प्रफुल्ल साने

अनुमोदक - मनोज पाटील

अनुकूल संख्या --------------- प्रतिकुल संख्या--------------- तटस्थ संख्या -------------------

ठराव/सर्वानुमते/~~बहुमताने~~/मंजूर/~~नामंजूर~~

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

# वसई-विरार शहर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय विरार
### मा.सर्वसाधारण सभा

**सर्वसाधारण सभा ठराव क्र. ३** **सभा सुचना क्र. ९** **दिनांक : २२/०६/२०२६**

---

**विषय :- शासकीय पत्र व्यवहार माहितीस्तव.**

**ठराव/निर्णय :-**

**शासन निर्णय दिनांक २०.१०.२०२३ नुसार गठीत जिल्हास्तरीय वेटलँड सनियंत्रण समिती संरचनेमध्ये सुधारणा करणेबाबत.**

१. महाराष्ट्र शासान, पर्यावरणीय व वातावरण बदल विभाग, शासन शुध्दीपत्रक क्रमांक : वेटलँड २०२६/ प्र.क्र.३३/ता.क.४, दिनांक २५/०५/२०२६.

**शासन निर्णय दिनांक ०६.०२.२०१८ नुसार गठीत राज्य वेटलैंड प्राधिकरणाच्या तांत्रिक समितीच्या संरचनेमध्ये सुधारणा**

२. महाराष्ट्र शासान, पर्यावरणीय व वातावरण बदल विभाग, शासन शुध्दीपत्रक क्रमांक : वेटलँड २०२६/ प्र.क्र.३३/ता.क.४, दिनांक २५/०५/२०२६.

वरिल शासकीय प्रत्र व्यवहाराची माहिती व प्रत प्राप्त झालेली आहेत असे एकमताने मान्य केले.

सुचक - प्रफुल्ल साने

अनुमोदक - मनोज पाटील

अनुकूल संख्या --------------- प्रतिकुल संख्या--------------- तटस्थ संख्या ------------------

ठराव/सर्वानुमते/~~बहुमताने~~/मंजूर/~~नामंजूर~~

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

# वसई विरार शहर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय विरार

## मा.सर्वसाधारण सभा

## सभा सुचना क्र. ०९

**सर्वसाधारण सभा ठराव क्र. ०४** दि.२२/०६/२०२६.

..................................................................................................................................................

**विषय** :- प्रभाग समिती 'एच', नवघर-माणिकपूर येथील आस्थापनेवरील कार्यरत श्री.जयेंद्र नारायण पाटील, सफाई कामगार यांची स्वेच्छा सेवानिवृत्ती मंजूर करणेबाबत...

वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'एच', नवघर-माणिकपूर येथील आस्थापनेवरील श्री.जयेंद्र नारायण पाटील, सफाई कामगार यांनी दि.२७/०४/२०२६ रोजी स्वेच्छा सेवानिवृत्ती मिळणे बाबत अर्ज सादर केला आहे.

श्री.जयेंद्र नारायण पाटील, यांची नवघर-माणिकपूर नगरपरिषद ग्रा.पं.मासिक मिटिंग ता.१९/३/९४ ठराव नं.८(१) नुसार दि.१/३/९४ पासून सफाई कामगार या पदावर नेमणूक करण्यात आलेली आहे.

श्री.जयेंद्र नारायण पाटील, सफाई कामगार यांची नेमणूकीपासून नवघर-माणिकपूर नगरपरिषद ते वसई विरार शहर महानगरपालिकेत ३२ वर्षे इतकी सेवा झालेली आहे. त्यांचे सद्याचे वय ५६ वर्षे असुन त्यांनी माझ्या कौटुंबिक अडचणीमुळे यापुढील सेवा करणे शक्य होणार नसल्याने माझी स्वेच्छानिवृत्ती मंजूर करावी हि नम्र विनंती असे नमुद केलेले आहे.

श्री.जयेंद्र नारायण पाटील, सफाई कामगार यांचे विरूध्द कोणतीही विभागीय चौकशी सुरू अथवा प्रस्तावित नाही, तसेच न्यायालयीन प्रकरण न्यायप्रविष्ठ नाही.

**महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ मधील नियम ६६ तरतूदीनूसार**

१. शासकीय कर्मचाऱ्याला त्याची २० वर्षांची अर्हताकारी सेवा पूर्ण झाल्यानंतर नियुक्ती प्राधिकाऱ्यास तीन महिन्यांची लेखी नोटीस देऊन सेवेमधून केव्हाही सेवानिवृत्त होता येईल.

२. स्वेच्छेने सेवानिवृत्त होण्याबद्दल पोटनियम (१) खाली दिलेली नोटीस, नियुक्ती प्राधिकाऱ्याने स्वीकारणे आवश्यक असेल. परंतू, उपरोक्त नोटीशीमध्ये नमूद केलेला कालावधी संपण्यापूर्वी नियुक्ती प्राधिकाऱ्याने सेवानिवृत्तीसाठी परवानगी देण्यास नकार दिला नाही तर, त्या कालावधीच्या समाप्तीच्या तारखेपासून सेवानिवृत्ती अंमलात येईल असे नमूद आहे.

तथापि महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ मधील नियम ६६ मधील तरतूदी नूसार श्री.जयेंद्र नारायण पाटील यांना दि.२७/०७/२०२६ पासून महानगरपालिका सेवेमधून स्वेच्छा सेवानिवृत्ती दिलेली असून, त्यांना सेवानिवृत्तीनंतर सर्व लाभ म्हणजेच सेवा निवृत्ती वेतन, सेवाउपदान, रजारोखीकरण व इतर अनुषंगिक लाभ देणे आवश्यक आहे.

निर्णय :- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील श्री.जयेंद्र नारायण पाटील, सफाई कामगार यांनी दि. २७/०४/२०२६ रोजी स्वेच्छा सेवानिवृत्ती मिळणेबाबतच्या विनंती अर्जानुसार त्यांची महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ कलम ६६ पोटनियम (१) मधील तरतुदी नुसार दि.२७/०७/२०२६ रोजी मध्यान्होत्तर महानगरपालिका सेवेतून दिलेल्या स्वेच्छा सेवानिवृत्तीस व सेवानिवृत्तीनंतर सेवा निवृत्ती वेतन, सेवाउपदान, रजारोखीकरण व इतर अनुषंगिक लाभ देणेस ही महासभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

सुचकांचे नाव - प्रफुल्ल साने

व स्वाक्षरी -

अनुमोदकाचे नाव - मनोज पाटील

व स्वाक्षरी -

अनुकुल संख्या ........ — ........प्रतिकुल संख्या........ — ........तटस्थ संख्या........ — ........

ठराव / सर्वानुमते / ~~बहुमताने~~ / मंजूर / ~~नामंजूर~~

(अजीव पाटील)
पिठासीन अधिकारी
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय विरार

## मा.सर्वसाधारण सभा

## सभा सुचना क्र. ०९

**सर्वसाधारण सभा ठराव क्र. ०५** दि.२२/०६/२०२६.

............................................................................................................................................

**विषय** :- प्रभाग समिती 'एच', नवघर-माणिकपूर येथील आस्थापनेवरील कार्यरत श्री.हरिदास जयराम म्हात्रे, सफाई कामगार यांची स्वेच्छा सेवानिवृत्ती मंजूर करणेबाबत...

वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'एच', नवघर-माणिकपूर येथील आस्थापनेवरील श्री. हरिदास जयराम म्हात्रे, सफाई कामगार यांनी दि.२७/०४/२०२६ रोजी स्वेच्छा सेवानिवृत्ती मिळणे बाबत अर्ज सादर केला आहे.

श्री.हरिदास जयराम म्हात्रे, यांची नवघर-माणिकपूर नगरपरिषद पंचायत मासिक सभा दि.२४/६/९३ ठराव नं.६ ने मजूर म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. पाचवा वेतन आयोग दि.२८/०७/२००० चे मान्यते नुसार दि.१/१/१९९६ रोजी सफाई कामगार या पदावर नेमणूक करण्यात आलेली आहे.

श्री.हरिदास जयराम म्हात्रे, सफाई कामगार यांची नेमणूकीपासून नवघर-माणिकपूर नगरपरिषद ते वसई विरार शहर महानगरपालिकेत ३२ वर्षे ११ महिने इतकी सेवा झालेली आहे. त्यांचे सद्याचे वय ५६ वर्षे असुन त्यांनी माझ्या पत्नीची तब्येत बरोबर नसल्याने तिची देखभाल करण्यासाठी यापुढील सेवा करणे शक्य होणार नसल्याने माझी स्वेच्छानिवृत्ती मंजूर करावी असे नमूद केलेले आहे.

श्री.हरिदास जयराम म्हात्रे, सफाई कामगार यांचे विरूध्द कोणतीही विभागीय चौकशी सुरू अथवा प्रस्तावित नाही, तसेच न्यायालयीन प्रकरण न्यायप्रविष्ठ नाही.

**महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ मधील नियम ६६ तरतूदीनूसार**

१. शासकीय कर्मचाऱ्याला त्याची २० वर्षांची अर्हताकारी सेवा पूर्ण झाल्यानंतर नियुक्ती प्राधिकाऱ्यास तीन महिन्यांची लेखी नोटीस देऊन सेवेमधून केव्हाही सेवानिवृत्त होता येईल.

२. स्वेच्छेने सेवानिवृत्त होण्याबद्दल पोटनियम (१) खाली दिलेली नोटीस, नियुक्ती प्राधिकाऱ्याने स्वीकारणे आवश्यक असेल. परंतू, उपरोक्त नोटीशीमध्ये नमूद केलेला कालावधी संपण्यापूर्वी नियुक्ती प्राधिकाऱ्याने सेवानिवृत्तीसाठी परवानगी देण्यास नकार दिला नाही तर, त्या कालावधीच्या समाप्तीच्या तारखेपासून सेवानिवृत्ती अंमलात येईल असे नमूद आहे.

तथापि महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ मधील नियम ६६ मधील तरतूदी नूसार श्री. हरिदास जयराम म्हात्रे यांना दि.२७/०७/२०२६ पासून महानगरपालिका सेवेमधून स्वेच्छा सेवानिवृत्ती दिलेली असून, त्यांना सेवानिवृत्तीनंतर सर्व लाभ म्हणजेच सेवा निवृत्ती वेतन, सेवाउपदान, रजारोखीकरण व इतर अनुषंगिक लाभ देणे आवश्यक आहे.

निर्णय :- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील श्री. हरिदास जयराम म्हात्रे, सफाई कामगार यांनी दि. २७/०४/२०२६ रोजी स्वेच्छा सेवानिवृत्ती मिळणेबाबतच्या विनंती अर्जानुसार त्यांची महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ कलम ६६ पोटनियम (१) मधील तरतुदी नुसार दि.२७/०७/२०२६ रोजी मध्यान्होत्तर महानगरपालिका सेवेतून दिलेल्या स्वेच्छा सेवानिवृत्तीस व सेवानिवृत्तीनंतर सेवा निवृत्ती वेतन, सेवाउपदान, रजारोखीकरण व इतर अनुषंगिक लाभ देणेस ही महासभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

सुचकांचे नाव - प्रफुल्ल सोने

व स्वाक्षरी -

अनुमोदकाचे नाव - मनोज पाटील

व स्वाक्षरी -

अनुकुल संख्या ........—........ प्रतिकुल संख्या........—........ तटस्थ संख्या........—........

ठराव / सर्वानुमते / ~~बहुमताने~~ / मंजूर / ~~नामंजूर~~

(अजीव पाटील)
पिठासीन अधिकारी
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय विरार

## मा.सर्वसाधारण सभा

**सर्वसाधारण सभा ठराव क्र. ०६**  **सभा सुचना क्र. ०९**  **दि. २२/०६/२०२६.**

**प्रस्तावाचा विषय** :- कु.जुहिली विनोद सातघरे यांना लाड समिती शिफारसी नुसार महानगरपालिका सेवेत 'लिपिक टंकलेखक' या पदावर सामावून घेणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकूर** : श्री. (विल्फ्रेड) आलेक्स फेलिक्स डिसिल्वा यांचे उपलब्ध सेवाविषयक अभिलेख नस्ती व सेवापुस्तकाची तपासणी केली असता तत्कालिन नवघर माणिकपूर ग्रामपंचायत सभा दि.१७/०६/१९९२ (ठराव क्र. १०अ) नुसार दि.१४/११/१९९२ पासुन त्यांची सफाई कामगार या पदावर नियुक्ती करण्यात आली असुन नगरपालिका प्रशासन संचालनालय यांचे आदेश क्र.एमसीके-१०९४/सीआर-५४८/९४/३ दि.१६/०६/१९९५ चे आदेशानुसार त्यांना सफाई कामगारांची वेतन श्रेणी लागू करण्यात आल्याची नोंद त्यांचे सेवापुस्तिकेत उपलब्ध आहे. श्री. (विल्फ्रेड) आलेक्स फेलिक्स डिसिल्वा, सफाई कामगार हे दिनांक दि.२६/११/२०२४ रोजी मयत झाले आहेत. श्री.आलेक्स फेलिक्स डिसिल्वा, सफाई कामगार यांची सेवा नियमीत केल्यापासून भुतपूर्व नवघर नगर परिषद व महानगरपालिकेत एकूण ३२ वर्षे इतकी सेवा झालेली आहे.

**कु.जुहिली विनोद सातघरे** यांनी त्यांचे मामा कै.(विल्फ्रेड) आलेक्स डिसिल्वा, यांचे जागी नोकरी मिळणेबाबत प्रभाग समिती 'एच' कार्यालयाकडे विनंती अर्ज सादर केलेला आहे. सदर अर्जाच्या अनुषंगाने प्रभाग समिती 'एच' आस्थापना विभागाने सदरचा अर्ज मुख्यालय आस्थापना विभागात कक्ष -२ येथे मूळ नस्तीसह प्रस्तावित केलेले आहे.

**प्रभाग समिती 'एच'** कार्यालयात श्रीमती. शैला विनोद सातघरे यांनी दि.०१/०४/२०२५ रोजी सादर केलेल्या अर्जात त्या कै. श्री.आलेक्स फेलिक्स डिसिल्वा यांची मोठी बहीण असुन सोबत स्वत:चे दि.१३/०३/२०२५ रोजीचे प्रतिज्ञापत्र तसेच त्यांची मुलगी कु.जुहिली विनोद सातघरे यांचे दि.२४/०३/२०२५ रोजीचे प्रतिज्ञापत्र तसेच मा.तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, वसई यांचा वारस दाखला सादर करीत असलेबाबत नमूद केलेले आहे. कै.(विल्फ्रेड) आलेक्स यांनी दि.३०/०१/२०२० रोजी प्रभाग समिती 'एच' कार्यालयात मृत्यु नि-सेवानिवृत्ती उपदानाकरिता नामनिर्देशनाची नोंद घेण्याबाबत सादर केलेल्या अर्जात "माझ्या भाचीला (कु.जुहिली सातघरे)" हिला नामनिर्देशन केले आहे. तशी नोंद सेवापुस्तिकेत घेणेबाबत केलेल्या अर्जासोबतच नामनिर्देशन फॉर्म सादर केलेला आहे.

**प्रभाग समती 'एच'** आस्थापना विभागाने सदर अर्जाच्या अनुषंगाने महानगरपालिकेचे विधी विभागाकडून अभिप्राय मागीतल्याचे निदर्शनास येत असून, त्यानुसार विधी विभागाकडील प्राप्त अभिप्रायातील मुद्या क्र.७ मध्ये कै.(विल्फ्रेड) आलेक्स डिसिल्वा यांनी नामनिर्देशन केलेल्या श्रीमती.सीमा ऑड्रीयन रिबेलो यांनी सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात कै.(विल्फ्रेड) आलेक्स डिसिल्वा यांचे सोबत लग्न झालेले नाही तसेच जॉर्डन हा कै.(विल्फ्रेड) आलेक्स डिसिल्वा यांचा मुलगा नाही व कै.आलेक्स डिसिल्वा हे मित्र होते. नामनिर्देशन अर्जात दिलेले माझे व मुलाचे नांव चुकीचे असल्याचे नमूद केलेले आहे.

**विधी विभागाकडील प्राप्त अभिप्रायातील** मुद्या क्र.९ मध्ये कै.(विल्फ्रेड) आलेक्स डिसिल्वा यांचे वारस कु.जुहिली विनोद सातघरे असल्याचे दिसून येते.

**मुद्या क्र.१०** मध्ये नामनिर्देशन नमुना अर्जात असे नमूद आहे की, पूर्वी केलेले नामनिर्देशन नवीन नामनिर्देशनानंतर रद्द ठरेल.

**मुद्या क्र.११** मध्ये महाराष्ट्र शासनाने सफाई कामगांराच्या वारसा हक्कांच्या अंमलबजावणीबाबत सुधारित तरतुदी दि.२४/०२/२०२३ रोजी शासन निर्णय जाहिर करण्यात आलेला आहे.

वरील सर्व बाबींनुसार कु.जुहीली विनोद सातघरे यांना दि.२४/०२/२०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार वारसा तत्वावर सेवेत रूजू करून घेणे बाबतचा योग्य तो निर्णय प्रभाग समिती-एच आस्थापना विभागाने घेणे उचित ठरेल. यानुसार विधी विभागाचे अभिप्राय प्राप्त आहेत.

**शासन निर्णय दि.२४/०२/२०२३ मधील मुद्या क्र. ५.७ मध्ये नमूद केलेनुसार सफाई कामगारास कोणीही पात्र वारस नसेल तेव्हा** : सफाई कामगाराच्या सेवानिवृत्तीनंतर संबंधितास वारसा हक्कानुसार नियुक्ती मिळण्यापूर्वी सफाई कामगाराचा मृत्यु झाल्यास त्याच्या वारसा हक्कामध्ये बाधा येणार नाही. तसेच त्या कामगाराने मृत्युपूर्वी दिलेले संमतीपत्र ग्राहय राहील आणि त्यानुसार त्याच्या वारसास/नामनिर्देशित व्यक्तिस नियुक्ती देण्यात येईल. जर सफाई कामगाराने मृत्युपूर्वी नामनिर्देशन दिले नसेल तर अशा विशिष्ठ प्रकरणात नामनिर्देशन देण्याचा अधिकार त्याच्या पत्नी/पतीस राहील. तथापि, पती/पत्नी हयात नसल्यास नामनिर्देशनाचे अधिकार कुटुंबियास राहतील.श्री. आलेक्स यांनी कु.जुहिली हिस दि.२०/०९/२०२४ रोजीचे प्रतिज्ञापत्राद्वारे नामनिर्देशित केले असून दि.२६/११/२०२४ रोजी श्री. आलेक्स यांचा मृत्यु झाला असल्याने त्यांनी सादर केलेले सदर नामनिर्देशन अंतिम ठरत असल्याचे दिसून येते.

महानगरपालिकेचे विधी सल्लागार यांचे अभिप्रायातील मुद्यांचे अवलोकन करता कै. (विल्फ्रेड) आलेक्स फेलिक्स डिसिल्वा यांचे वारस कु.जुहीली विनोद सातघरे असल्याचे दिसून येते असे नमूद आहे तरी कै.(विल्फ्रेड) आलेक्स फेलिक्स डिसिल्वा, सफाई कामगार यांचे जागेवर वारसा हक्काने कु.जुहीली विनोद सातघरे यांच्या शैक्षणिक (B.Com) अर्हतेनुसार लिपिक-टंकलेखक पदावर नियुक्ती देणे योग्य होईल, अशी धारणा आहे.

**सेवानिवृत्त सफाई कर्मचा-यांच्या वारसा हक्क नियुक्ती प्रस्तावाचे छाननी पत्रक**

**अ) सेवानिवृत्त सफाई कामगारांची माहिती**

| अ.क्र. | माहितीचा तपशिल | आवश्यक कागदपत्रे |
|---|---|---|
| १ | श्री. (विल्फ्रेड)आलेक्स फेलिक्स डिसिल्वा | सरळ सेवेने |
| २ | जन्म दिनांक. १४/०८/१९७६ | सेवापुस्तकाची सांक्षाकीत प्रत |
| ३ | नियुक्ती दिनांक १४/११/१९९२ | सेवापुस्तकाची सांक्षाकीत प्रत |
| ४ | मुळ नियुक्ती पध्दत- | **सरळसेवा** |
| ५ | सफाई कामगार या पदावरुन पदोन्नती दिली आहे काय असल्यास पदनाम | पदोन्नती दिलेली नाही. |
| ६ | महानगरपालिकेत सफाई कामगार म्हणुन केलेली एकुण सेवा-वर्ष | ३२ वर्षे |
| ७ | कोणत्या पदावर सेवासमाप्ती | **सफाई कामगार** |
| ८ | कोणत्या तारखेला पद रिक्त | **दि.२६/११/२०२४** |
| ९ | सेवासमाप्तीचा प्रकार | **निधन झाल्यामुळे** |
| १० | पद रिक्त झाल्याचे कारण | **निधन झाल्यामुळे** |
| ११ | सेवा कालावधीनुसार वारस पात्र आहे काय | **होय, पात्र आहे...** |

**ब) वारसाची माहिती**

| अ.क्र. | तपशिल | | पुरावा दाखल कागदपत्र |
|---|---|---|---|
| १ | वारसाचे नाव | कु.जुहिली विनोद सातघरे | श्री. (विल्फ्रेड) आलेक्स यांचे प्रतिज्ञापत्र दि.२०/०९/२०२४ |
| २ | वारसाचे नाते | भाची | सोबत कागदपत्र जोडलेले आहेत. |
| ३ | वारसाचा जन्म दिनांक | दि. २९/०५/१९९४ | शाळा सोडल्याचा दाखला |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | वारसाचे अर्ज करते वेळी वय | एकुण ३० वर्ष | अनुज्ञेय आहे... |
| ५ | वारस हक्क नियुक्तीसाठी मनपाकडे प्राप्त वारसाचा अर्ज दिनांक | अर्ज दि. १२/१२/२०२४ | पात्रता योग्य आहे |
| ६ | वारसाची शैक्षणीक अर्हता | १५ वी पास (B.Com) | पदवी प्रमाणपत्र प्रत |
| ७ | वारसाची जात | **हिंदू-सोनार** | जात प्रमाणपत्र |
| ८ | सफाई कामगारांचा मृत्यु/ सेवानिवृत्त/स्वेच्छानिवृत्ती/ रुग्णता सेवा निवृत्ती झाला असल्यास पात्र वारसाचे संम्मती पत्र | कुटूंबातील सदस्यांचा वारस दाखला /संमतीपत्र/प्रतिज्ञापत्र आहे | कुटूंबातील एकूण व्यक्ती - |
| ९ | वारसास पात्र असणारी व्यक्ती त्याच कुटुंबात राहत असल्या बाबत पुरावा | रेशन कार्ड क्रमांक NO. SE.no.०२९१०७६ | मयत कर्मचा-याचे रेशकार्ड जोडले आहे. SE.no.०६८४५४३ वारसाचे रेशकार्ड SE.no.०२९१०७६ जोडले आहे. |
| १० | अर्जदाराशी नाते | भाची | **सेवेसाठी पात्र** |
| ११ | प्रतिज्ञापत्र सोबत जोडले आहे काय | होय | प्रतिज्ञापत्र सोबत जोडले आहे. |
| १२ | जात पडताळणी प्रमाणपत्र आहे काय | - | शासन निर्णय दि. ११/०३/२०२४ नुसार शासन निर्णय दि. २४/०२/२०२३ मधिल अनु क्र. ८.४ नुसार नियुक्ती देण्यापूर्वी जात जातवैद्यता प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्याची अट वगळण्यात आलेली आहे. |
| १३ | लहान कुटूंबाचे प्रमाणपत्र | - | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन शुध्दीपत्रक दि.११ मार्च,२०२४ नुसार लहान कुटूंबाचे प्रमाणत्र प्राप्त करुन घेण्याची अट वगळण्यात आलेली आहे. |
| १४ | वारस कोणत्या पदासाठी पात्र होऊ शकेल. | लिपीक-टंकलेखक | |
| १५ | शिफारस | वारस कु.जुहिली विनोद सातघरे यांना वारसा हक्काने महानगर पालिका सेवेत लिपिक टंकलेखक या पदासाठी पात्र आहे. | |

**संदर्भ क्र.२ शासन निर्णय क्र.सफाई-२०१८/प्र.क्र.४६/सआक, दि.२४ फेब्रुवारी, २०२३ मधील तरतूदी खालीलप्रमाणे:-**

१. **सफाई कामगारांची व्याख्या** :- लाड समितीच्या अहवालातील शिफारशींच्या अनुषंगाने, घाणीशी संबंधीत उदा. शौचालय स्वच्छता, घाणीशी संबंधीत मलनि:सारण व्यवस्था, नाली-गटारे, ड्रेनेज तसेच रुग्णालय व शव विच्छेदन गृहातील घाणीशी संबंधीत ठिकाणी सफाईचे काम करणाऱ्या खालील व्यक्ती-

१. अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्ग.

२. **सफाई कामगारांच्या व्याख्येत बसणारे सर्व सफाई कामगार.**

३. पूर्वी ज्या सफाई कामगारांनी डोक्यावरुन मैला वाहून नेण्याचे काम केले आहे. अशा सफाई कामगारांच्या वारसांना वारसा हक्काने नोकरीमध्ये प्राधान्य देण्यात यावे.

२. **सफाई कामगारांच्या व्याख्येत बसणारे सर्व सफाई कामगार.**

२. **सफाई कामगारांकरीता वारसाहक्काची तरतूद**:- शासकीय/निमशासकीय/**महानगरपालिका**/ नगरपालिका/नगरपरिषदा/कटकमंडळे (कंटेनमेंट बोर्ड) राज्य शासनाची महामंडळे / राज्य शासनाच्या स्वायत्त संस्था/ Parastatal संस्था/ अनुदानित संस्था शासकीय रुग्णालये, वैद्यकीय महाविद्यालये, पशुवैद्यकीय महाविद्यालये इत्यादी आस्थापनेवरील उपरोक्त (१) येथे नमूद व्याख्येनूसार सफाई कामगारांना त्यांच्या सेवानिवृत्तीनंतर, **मृत्यूनंतर**, स्वेच्छा निवृत्तीनंतर किंवा त्यांना वैद्यकीयदृष्टया अपात्र ठरविल्यानंतर सफाई कामगाराचे आर्थिक नुकसान होऊ नये व त्याचे कुटूंब बेघर होऊ नयेआणि त्यास सामाजिक संरक्षण प्राप्त होण्याच्या दृष्टीने, लाड समितीच्या शिफारशीनूसार संबंधित सफाई कामगाराच्या जागी त्याच्या वारसाची नियमानुसार वारसा हक्काने नियुक्ती करण्याची कार्यवाही करावी.

३. **वारसा हक्काने पात्र ठरणारे सफाई कामगाराचे वारस :-**

३.१ पती/पत्नी

३.२ मुलगा / मुलगी

३.३ सून /जावई

३.४ विधवा मुलगी / बहिण/घटस्फोटीत मुलगी/बहिण/परित्यक्त्या मुलगी/बहिण/अविवाहित मुलगी अविवाहित बहिण.

३.५ सफाई कर्मचारी अविवाहीत असल्यास त्यांचा सख्खा भाऊ/सख्खी बहीण

३.६ नात/नातू

३.७ वरील पैकी कोणीही वारस उपलब्ध नसल्यास अथवा सदर वारसापैकी कोणीही सफाईचे काम करण्यास तयार नसल्यास सफाई कामगाराचा तहहयात सांभाळ करण्याची लेखी शपथपत्राव्दारे हमी देणारी संबंधित **'नामनिर्देशित व्यक्ती'** असे नमूद आहे.

७. **सफाई कामगाराच्या वारसास शैक्षणिक अर्हतेनुसार नियुक्ती:-**

७.१ शासकीय/निमशासकीय/महानगरपालिका/नगरपालिका/नगरपरिषदा/कटकमंडळे (कंटेनमेंट वोर्ड) राज्य शासनाची महामंडळे / राज्य शासनाच्या स्वायत्त संस्था/ Parastatal संस्था / अनुदानित संस्था शासकीय रुग्णालये, वैद्यकीय महाविद्यालये, पशुवैद्यकीय महाविद्यालये इत्यादी आस्थापनेच्या सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी त्यांच्याकडील ज्येष्ठता यादीतील सफाई कामगाराच्या वारसास त्याची शैक्षणिक अर्हता विचारात घेऊन त्याआधारे त्यांची नेमणूक वर्ग-४ किंवा वर्ग-३ मध्ये करावी.

**७.२ नियुक्ती प्राधिकारी यांनी अशी कार्यवाही करताना संबंधित सफाई कामगाराचा वारस हा वर्ग-३ वा वर्ग-४ मधील कोणत्याही पदासाठी शैक्षणिक अर्हता प्राप्त करीत असल्यास त्याची शैक्षणिक अर्हता विचारात घेऊन त्यानुसार त्यास वर्ग-३ वा वर्ग-४ च्या पदावर नियुक्ती देण्याची कार्यवाही करावी. मात्र वर्ग ३ चे पद उपलब्ध असल्यास व संबंधित वारसाची इच्छा असल्यास त्याला प्राधान्याने वर्ग ३ च्या पदावर नियुक्ती दयावी.**

उपरोक्त शासन निर्णयातील तरतुदीनुसार तसेच महापालिकेचे विधीसल्लागार यांचेकडील प्राप्त अभिप्रायातील मुद्या क्र. ९ चे अवलोकन करता कै. (विल्फ्रेड) आलेक्स फेलिक्स डिसिल्वा यांच्या वारस त्यांची भाची कु.जुहिली विनोद सातघरे या लाड समितीच्या शिफारशीनुसार " लिपिक-टंकलेखक " या पदावर नियुक्ती देणेस पात्र आहेत.

**सबब शासन निर्णय क्र.सफाई-२०१८/प्र.क्र.४६/सआक, दि.२४ फेब्रुवारी, २०२३ मधील तरतूदीनुसार** कै. श्री. (विल्फ्रेड) आलेक्स फेलिक्स डिसिल्वा यांचा वारस त्यांची भाची कु.जुहिली विनोद सातघरे यांनी धारण केलेल्या शैक्षणिक अर्हतेनुसार व इतर अटी शर्तीच्या अधिन राहून वारसाहक्काने महानगरपालिका सेवेत "लिपिक-टंकलेखक" या पदावर सामावून घेणे बाबतच्या प्रस्तावावर विचार विनिमय करून खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आला.

**निर्णय/ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कर्मचारी <u>कै. श्री. (विल्फ्रेड) आलेक्स फेलिक्स डिसिल्वा, सफाई कामगार</u> हे दि. २६/११/२०२४ रोजी मयत झाले असून <u>त्यांची भाची कु.जुहिली विनोद सातघरे</u> हया शासन निर्णय क्र.सफाई २०१८/प्र.क्र.४६/ सआक,दि.२४ फेब्रूवारी, २०२३ मधील तरतुदीनुसार वारस हक्क नियुक्तीसाठी पात्र असल्याने त्यांना लाड समितीच्या शिफारसीनुसार वारस हक्काने महानगरपालिका सेवेत "लिपिक-टंकलेखक" या पदावर सामावुन घेणेस ही महासभा मान्यता देत आहे.**

सुचकाचे नाव : प्रफुल्ल सोने
व स्वाक्षरी

अनुमोदकाचे नाव : मनोज पाटील
व स्वाक्षरी

अनुकूल संख्या .....—..... प्रतिकुल संख्या .....—..... तटस्थ संख्या .....—.....

ठराव/सर्वानुमते/~~बहुमताने~~/मंजूर/~~नामंजूर~~

(श्री.अजीव यशवंत पाटील)
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय विरार
### मा.सर्वसाधारण सभा

**सर्वसाधारण सभा ठराव क्र. ७** **सभा सुचना क्र. ९** **दिनांक : २२/०६/२०२६**

---

**विषय :- महानगरपालिका कार्यक्षेत्रातील रहदारी व वाहतुक नियंत्रणाकरीता बसविणेत आलेल्या सिग्नल यंत्रणांची १ (एक) वर्षाकरिता साहित्यासह देखभाल दुरुस्ती करणेकामास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.**

**ठराव/निर्णय** :- सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती पुढे सादर करण्याबाबत सभागृहाने असे एकमताने मान्य केले.

सुचक - प्रफुल्ल साने

अनुमोदक - मनोज पाटील

अनुकूल संख्या ---------------- प्रतिकुल संख्या---------------- तटस्थ संख्या --------------------

ठराव/सर्वानुमते/~~बहुमताने~~/मंजूर/~~नामंजूर~~

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

# वसई-विरार शहर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय विरार
## मा.सर्वसाधारण सभा

**सर्वसाधारण सभा ठराव क्र. ८** **सभा सुचना क्र. ९** **दिनांक : २२/०६/२०२६**

---

**विषय :- सन २०२५-२६ ह्या वर्षात जिल्हा वार्षिक योजना नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत कामांना प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.**

**नागरी दलित वस्ती सुधारणा योजना** सन २०२५-२६ च्या वित्तीय वर्षासाठी प्रस्ताव जिल्हा प्रशासन अधिकारी, नगरपालिका प्रशासन, पालघर ह्यांचेकडे मा.आयुक्त ह्यांचे ठराव क्र.१५५०, दि.३१/१०/२०२५ अन्वये मंजूरी घेऊन सादर करण्यात आला होता. सदर कामांना मा.जिल्हाधिकारी, पालघर ह्यांची जा.क्र.सआसक/जिनिसपा/अजाउयो/प्र.मा./२०२५-२६/२८१, दि.२५/०३/२०२६ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मंजूरी प्राप्त झालेली आहे. प्राप्त प्रशासकीय आदेशमध्ये नमुद केल्याप्रमाणे खालील तक्त्याच्या अनुषंगाने महानगरपालिका फंडातून निधी खर्च करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | मंजूर निधी | महानगरपालिका फंडातून होणारा खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग समिती बी वॉर्ड क्र.५२ सेंट्रल पार्क मैदानाभेवतीचा रस्ता डांबरीकरण करणे. | रु.८९,४६,८९०/- | रु.८३,८९,८९०/- | रु.५,५७,०००/- |

तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधि. १९४९ चे कलम ७३ अन्वये मंजूर कामाला प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याचे अधिकार मा.सर्वसाधारण सभेला आहेत.

तरी सदरचा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेपुढे ठेवणेस शिफारस असे.

**ठराव/निर्णय :-** सन २०२५-२६ ह्या वर्षात जिल्हा वार्षिक योजना नागरी दलित वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत कामांना मंजूर निधीच्या मर्यादेत राहून प्रशासकिय व वित्तीय मंजूरी देण्यात येत आहे.

सुचक -

अनुमोदक -

अनुकूल संख्या --------------- प्रतिकुल संख्या--------------- तटस्थ संख्या ------------------

ठराव/सर्वानुमते/बहुमताने/मंजूर/नामंजूर

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

# वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पश्चिम, जि.पालघर, पिन नं 401 303

दूरध्वनी - 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स - 0250-2525107

ई-मेल -vasaivirarcorporation@yahoo.com


---

**प्रशासकीय ठराव क्र.** ०९

विभाग : आस्थापना (मु.)

दिनांक : २२/०६/२०२६

---

**प्रस्तावाचा विषय** :- सन २०२६ ते २०२७ या वित्तिय वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिकेसाठी सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा यांचे कडील २०७ पैकी १५७ सुरक्षा रक्षकांची पुर्ननियुक्ती करणेकामी येणा-या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकूर** :- वसई विरार शहर महानगरपालिकेने मा. सर्वसाधारण सभा ठराव क्र. ०९, दि. १७/०२/२०१८ अन्वये महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाकडून सुरक्षा रक्षक घेण्याची शिफारस करण्यात आलेली आहे. त्यानुसार त्यांचेकडे मागणी नोंदविलेली आहे. त्यांचेकडून सुरक्षा रक्षक उपलब्ध होणेस विलंब होत असल्याने सुरक्षा रक्षक मंडळ, सानपाडा, नवि मुंबई यांचेकडून सुरक्षा रक्षक घेणेस मा. महासभेने प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. एसजीए- १५०६/प्र.क्र.९२/काम-५, दि. ८ नोव्हेंबर, २००६ रोजी सरकारी निमसरकारी क्षेत्रे/उपक्रम/शासकीय मंडळे महामंडळे/ महानगरपालिका/स्थानिक स्वराज्य संस्था/सहकारी संस्था/ शासकीय कार्यालय इत्यादी ठिकाणी, शासनाने स्थापन केलेल्या सुरक्षा रक्षक मंडळातील सुरक्षा रक्षकांची नेमणुक करण्याबाबत तसेच माजी सैनिकांची सुरक्षा रक्षक म्हणुन सुरक्षा रक्षक मंडळामध्ये प्राधान्याने नेमणूक करण्याबाबत शासन निर्णय निर्गमित झालेला आहे सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने महापालिकेसदेखील आवश्यकता असल्याने आवश्यकतेनुसार महाराष्ट्र सुरक्षा रक्षक महामंडळाकडुन मा. स्थायी समिती ठराव क्र. १६६० नुसार दि. ११/०३/२०१५ रोजी सुरक्षा रक्षक घेण्यास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देण्यात आली आहे.

उद्योग उर्जा व कामगार विभागाकडील शासन निर्णय क्र. एसजीए-१५०६/प्र.क्र. ९२/काम-५, दि. ८ नोव्हेंबर, २००६ अन्वये विना निविदा सुरक्षा रक्षक मंडळाकडून सुरक्षा रक्षक घेणेचे असल्याने महानगरपालिकेने पत्र जावक क्र. वविशम/आस्था/२८०/२०१८, दि. १३/०७/२०१८ अन्वये महापालिकेने सुरक्षा रक्षक बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा यांना पत्र देऊन लवकरात लवकर सुरक्षा रक्षक पूरविण्याबाबत कळविण्यात आले आहेत. त्यात ९६ पुरुष सुरक्षा रक्षक व ५० महिला सुरक्षा रक्षक अशी मागणी केली होती.

सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा यांचा वसई विरार शहर महानगरपालिकेचा नोंदणी क्र. २९९७, दि. २८/०९/२०१२ असा आहे.

सुरक्षा रक्षक बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा यांचेकडील पत्र क्र. सुरमं/सचिव/२०१८-६०८९, दि. २५ जुलै, २०१८ नुसार यांनी असे कळविले आहे की, सुरक्षा रक्षक मंडळ ही कल्याणकारी संस्था असून शासनाने निर्माण केलेले स्वायत्त मंडळ आहे. तसेच मंडळ हे ठेकेदार नसल्यामुळे कंत्राटी कामगार कायदा, १९७० मधील तरतूदी मंडळाला लागू होत नाहीत व कंत्राटी पध्दतीने सुरक्षा रक्षक नियुक्त केले जात नाहीत. तसेच महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम १९८१ व त्याअंतर्गत असलेल्या योजनेमध्ये तरतूद नसल्यामुळे मंडळ कोणत्याही आस्थापनेशी करार करीत नाही. पर्यवेक्षणास सहाय्यक सुरक्षा अधिकारी व सुरक्षा पर्यवेक्षक लागतील असे कळविण्यात आले आहे. त्यानुसार सुधारीत मागणीपत्र पाठविणे आवश्यक आहे.

तसेच सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा यांना सेवा व वस्तु कर (G S T) लागु नाही तसेच या संदर्भात मे. न्यायालयात दावा सुरू आहे.

महानगरपालिकेत सुरू असलेला मे. सैनिक इंटलिजन्स् ॲन्ड सिक्युरिटी प्रा. लि. यांचा ठेका हा विना निविदा ठेका असून ते बंद करावयाचे निर्देश मा. आयुक्त सो. यांनी दिलेले आहेत. तथापि कोव्हीड -१९ ची दुसरी लाट आल्याने महानगरपालिकेतील सर्व रुग्णालये, लसीकरण केंद्र, ऑक्सीजन पुरवठा करणाऱ्या कंपनी, विलगीकरण कक्ष, बेघर रात्र निवारा केंद्र तसेच इतर आवश्यक ठिकाणी सुरक्षा रक्षकांना कार्यरत ठेवण्यात आलेले आहेत. सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा यांचेकडून जेव्हा १५४ सुरक्षा रक्षक पूर्णपणे महानगरपालिकेत कार्यरत होतील तेव्हापासून मे. सैनिक इंटलिजन्स ॲन्ड सिक्युरिटी प्रा. लि. यांचा ठेका बंद करणे संयुक्तीक होईल असे मत आहे.

मा.पोलीस उप-आयुक्त मिरा भाईंदर-वसई विरार पोलीस आयुक्तालय यांनी दि. १५/१२/२०२० अन्वये शहरांतर्गत वाहतूक नियंत्रणासाठी महानगरपालिकेकडे सुरक्षा रक्षकांची मागणी केलेली होती त्या अनुषंगाने महानगरपालिकेने जावक क्र.वविशम/आस्था/१७७/२१,दि.०७/०४/२०२१ च्या आदेशानुसार सुरक्षा रक्षक बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा यांचेकडे ५० सुरक्षा रक्षकांची मागणी करून ते सुरक्षा रक्षक पोलीस विभागात वाहतूक नियंत्रण शाखा, वसई येथे पुरविणेचा आदेश दिलेला आहे. त्यानुसार मंडळाने दि. १६/०४/२०२१ पासून ५० सुरक्षा रक्षक पोलीस विभागात वाहतूक नियंत्रण शाखा, वसई येथे पुरविलेले होते व माहे जून २०२१ पासून ५० सुरक्षा रक्षक पुरविले जात आहेत.

कामगार उप-आयुक्त व अध्यक्ष, सुरक्षा रक्षक बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा यांनी मे. सैनिक इंटलिजन्स् एण्ड सिक्युरिटी प्रा.लि यांचे कडील कार्यरत असलेल्या ३७ सुरक्षा रक्षकांपैकी १५ सुरक्षा रक्षक त्यांचे कडे नोंदीत झाल्याने सदर २२ महिला व पुरुष सुरक्षा रक्षकांना दि.०१/१२/२०२२ पासून सुरक्षा रक्षक बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा यांचेमार्फत महानगरपालिकेत कर्तव्यावर रुजू करून घेण्यास कळविले होते. मा. अतिरिक्त आयुक्त (उ.) यांनी सचिव, सुरक्षा रक्षक बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा यांना ५ सुरक्षा रक्षकांना दि.०१/१२/२०२२ पासून त्यांचे मंडळामार्फत महानगरपालिकेने कर्तव्यावर रुजू करून घेतलेबाबत कळविले होते. मा. अतिरिक्त आयुक्त (उ.) यांनी आपल्या ठेक्यामार्फत कार्यरत असलेल्या ३७ महिला व पुरुष सुरक्षा रक्षकांपैकी ५ सुरक्षा रक्षक सुरक्षा रक्षक बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा यांचेकडे नोंदीत झाले आहेत.

कामगार उप-आयुक्त व अध्यक्ष, सुरक्षा रक्षक बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा यांनी मे. सैनिक इंटलिजन्स् एण्ड सिक्युरिटी प्रा.लि यांचे कडील कार्यरत असलेल्या ३२ सुरक्षा रक्षकांपैकी १७ सुरक्षा रक्षक त्यांचे कडे नोंदीत झाल्याने सदर २ महिला व १५ पुरुष सुरक्षा रक्षकांना सुरक्षा रक्षकांना दि. २८/०२/२०२४ पासून बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा यांचेमार्फत महानगरपालिकेत कर्तव्यावर रुजू करून घेण्यास कळविले होते. मा. अतिरिक्त आयुक्त (उ.) यांनी कामगार उप-आयुक्त व अध्यक्ष, सुरक्षा रक्षक बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा यांना जावक क्र. वविशम / आस्था /७९७/२०२४, दि. १९/०६/२०२४ अन्यवे १७ सुरक्षा रक्षकांपैकी १ महिला व १२ पुरुष असे एकूण १३ सुरक्षा रक्षकांना दि.०१/०७/२०२४ पासून त्यांचे मंडळामार्फत महानगरपालिकेने कर्तव्यावर रुजू करून घेतलेबाबत कळविले होते.

सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा यांची मुदतवाढीची मुदत दि.३१/०३/२०२५ रोजी संपुष्टात आली होती. सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा यांना सुरक्षा रक्षक पुरविण्याच्या कामासाठी एक वर्षाची मुदतवाढ देणेकरीता (दि.०१/०४/२०२५ ते ३१/०३/२०२६) या कालावधीकरीता मा. आयुक्त तथा प्रशासक यांनी आर्थिक व प्रशासकीय मान्यतेचा ठराव क्र. ६२, दि. ०८/०४/२०२५ रोजी पारीत केलेला आहे.

नविन २० सुरक्षा रक्षक, सुरक्षा रक्षक मंडळ, बृहमुंबई आणि ठाणे जिल्हा यांचेकडून उपलब्ध करून घेण्यास व त्यांच्या वेतनावर होणा-या प्रती महिना रक्कम रु. ६,२४,७४०/- व वार्षिक रक्कम रु. ७४,९६,८८०/- एवढया खर्चास तसेच ४० अकुशल मनुष्यबळ मे सैनिक इंटेलिजस ॲन्ड सेक्युरीटी प्रा.लि यांचेकडून उपलब्ध करून घेण्यास व त्यांच्या वेतनावर होणा-या किमान वेतनानुसार प्रती अकुशल मनुष्यबळ प्रती महिना रक्कम रु. २३,५८०/- या प्रमाणे प्रती महिना रक्कम रु. ९,४३,२००/- व वार्षिक रक्कम रु. १,१३,१८,४००/- अश्या एकूण रक्कम रु. १,८८,१५,२८०/- एवढा खर्चास व वेळोवेळी मा. कामगार आयुक्त यांचे कार्यालयामार्फत जाहीर करण्यात येणा-या वाढीव विशेष भत्त्यानुसार देय होणा-या खर्चास मा. आयुक्त साहेबांनी ठराव क्र. २९७ महानगरपालिकेच्या प्रभाग समिती “ए” ते “आय”, विशेष नियोजन प्राधिकरण, सी.यु.सी. मुख्यालय तसेच महानगरपालिकेच्या मालकीच्या विविध रुग्णालये, माता बाल संगोपन केंद्र, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे इत्यादी ठिकाणी २० सुरक्षा रक्षक (८ महिला व १२

पुरुष) दि. ०१/०६/२०२५ पासून उपलब्ध करून दयावेत असे मा. उप-आयुक्त आस्थापना यांनी दि.२७/०५/२०२५ रोजी सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा, सानपाडा यांना पत्र दिले होते.

सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा, सानपाडा यांचेकडून संदर्भ क्र. १३ नुसार (८ महिला व १२ पुरुष) असे एकूण २० सुरक्षा रक्षक पुरविले आहेत. तसेच सुरक्षा रक्षक बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा यांनी मे. सैनिक इंटलिजन्स् एण्ड सिक्युरिटी प्रा.लि यांचे कडील कार्यरत असलेल्या १९ सुरक्षा रक्षकांपैकी २ सुरक्षा रक्षक त्यांचे कडे नोंदीत झाल्याने सदर २ पुरुष सुरक्षा रक्षकांना दि. ०१/०४/२०२६ पासून बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा यांचेमार्फत महानगरपालिकेत कर्तव्यावर रुजू करून घेण्यास कळविले आहे.

सद्यस्थितीत वसई विरार शहर महानगरपालिका मुख्यालय व विविध प्रभाग समितीमध्ये १५७ सुरक्षा रक्षक व वाहतुक नियंत्रण शाखा, वसई व विरार यांना ५० सुरक्षा रक्षक असे एकूण २०७ सुरक्षा रक्षक, सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा यांचेमार्फत कार्यरत आहेत.

सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा यांची मुदतवाढीची मुदत दि.३१/०३/२०२६ रोजी संपुष्टात येणार असून यांना सन २०२६ ते २०२७ (दि. ०१/०४/२०२६ ते दि. ३१/०३/२०२७) या वित्तिय वर्षाकरीता वसई विरार शहर सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा, सानपाडा यांचेकडील एकूण २०७ सुरक्षा रक्षकांपैकी १५७ सुरक्षा रक्षकांना महानगरपालिकेसाठी पुर्ननियुक्ती करणेकामी व सदर कालावधीकरीता सुरक्षा रक्षक यांच्या वेतनावर होणा-या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे.

सदर कामी सन २०२६-२७ या वित्तीय वर्षासाठी "पोलीस संरक्षणासह सुरक्षा रक्षक" या लेखाशिर्षांतर्गत आवश्यक तरतूद करण्यात येईल. सन २०२६-२७ या वर्षाकरीता "पोलीस संरक्षणासह सुरक्षा रक्षक" या लेखाशिर्षांतर्गत रक्कम रू. १३,५३,००,०००/- इतकी तरतूद करण्यात आलेली असून सदरचा खर्च या लेखाशिर्षांतर्गत भागविण्यात येईल.

वसई विरार शहर महानगरपालिकेत सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा यांचे सुरक्षा रक्षकांचे दर व अंदाजीत मासिक व वार्षिक खर्च तपशिल खालील तक्त्यात नमूद आहे.

सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा, सानपाडा (सद्या कार्यरत)

| पदांचे नाव | एकुण सुरक्षा रक्षक | दर प्रति महा | मासिक खर्च रुपये | वार्षिक खर्च रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| सहा.सुरक्षा अधि. | ०१ | ३४,१८४.०० | ३४,१८४.०० | ४,१०,२०८.०० |
| पर्यवेक्षक | ०३ | ३३,८१२.०० | १,०१,४३६.०० | १२,१७,२३२.०० |
| सुरक्षा रक्षक | १५३ | ३२,१९९.०० | ४९,२६,४४७.०० | ५,९१,१७,३६४.०० |
| **एकुण** | **१५७** | | **५०,६२,०६७.००** | **६,०७,४४,८०४.००** |

सद्यस्थितीत सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा, सानपाडा यांचेकडील एकुण २०७ सुरक्षा रक्षकांपैकी पोलीस वाहतूक विभागातील ५० सुरक्षा रक्षक वगळून १५७ सुरक्षा रक्षक महानगरपालिकेत कार्यरत असुन त्यांचा मासिक व वार्षिक खर्च उपरोक्त तक्त्यात नमूद आहे.

सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा, सानपाडा यांनी महानगरपालिकेस एकुण २०७ सुरक्षा रक्षकांपैकी पोलीस वाहतूक विभागातील ५० सुरक्षा रक्षक वगळून १५७ सुरक्षा रक्षक उपलब्ध करुन दिले असल्याकारणाने त्यांच्यावर सन २०२६ ते २०२७ या वित्तिय वर्षाच्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणे व पुर्ननियुक्ती देणेस मंजूरीस्तव सादर.

**<u>ठराव/ निर्णय</u>** :- सुरक्षा रक्षकांबाबतचा प्रशासनाकडून सादर करण्यात आलेला अहवाल महासभेत वाचण्यात आला तसेच कामगार कल्याण विभागाकडील शासन निर्णय क्र. एसजीए-१५०६/प्र.क्र.९२/काम-५ दि. ८/११/२००६ अन्वये राज्य सुरक्षा महामंडळ, सुरक्षा रक्षक मंडळ व माजी सैनिक महामंडळ मर्या. (मेस्को) यांचेकडून सुरक्षा रक्षक घेणे अनिवार्य आहे. तसेच सुरक्षा रक्षकांना किमान वेतनानुसार वेतन व इतर लेव्हीच्या रक्कमा मिळणे आवश्यक आहे. या सर्व बाबींचा विचार करून खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा, सानपाडा यांचेमार्फत महानगरपालिकेस एकूण २०७ सुरक्षा रक्षक पुरविले जात असून सन १ एप्रिल, २०२६ ते ३१ मार्च २०२७ या कालावधीकरिता २०७ सुरक्षा रक्षकांची पुर्ननियुक्ती देणे व याकामी होणाऱ्या खर्चास पूर्वलक्षीप्रभावाने प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे. परंतु २०७ पैकी १५७ सुरक्षा रक्षक जुलै २०२६ पासून कार्यालयासाठी पुरवठा करून घेणे व उर्वरित वाहतूक विभागाकडील ५० सुरक्षा रक्षक आवश्यकतेनुसार घेणेबाबत हि सभा सूचित करीत आहे

सुचकाचे नाव :- मनोज पाटील

स्वाक्षरी :- [signature]

अनुमोदकाचे नाव :- प्रफुल्ल साने

स्वाक्षरी :- [signature]

अनुकूल संख्या -------------------प्रतिकुल संख्या------------------- तटस्थ संख्या------------------

ठराव/सर्वनुमते/~~बहूमताने~~/मंजूर/~~नामंजूर~~

[signature]

**(अजिव पाटील)**
**महापौर तथा**
**पिठासीन अधिकारी**
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय विरार
### मा.सर्वसाधारण सभा

**सर्वसाधारण सभा ठराव क्र. १०** **सभा सुचना क्र. ९** **दिनांक : २२/०६/२०२६**

---

**विषय :- वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (जी) कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. १०५ मध्ये नायगाव पूर्व जुचंद्र येथील नायगाव बापाणे रस्त्यावर ५ ठिकाणी बॉक्स कल्वर्ट बांधणे या कामास सुधारीत प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.**

**ठराव/निर्णय :-** सदरच्या प्रस्तावावर सभागृहात चर्चा करण्यात आली. चर्चाअंती सदरचा प्रस्ताव स्थगित ठेवण्यात आला.

सुचक - प्रफुल्ल साने

अनुमोदक - मनोज पाटील

अनुकूल संख्या --------------- प्रतिकुल संख्या--------------- तटस्थ संख्या -------------------

ठराव/सर्वानुमते/~~बहुमताने~~/मंजूर/~~नामंजूर~~

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

मुख्य कार्यालय, विरार (प.), जि. पालघर, पिन नं. ४०१३०३
दुरध्वनी – ०२५० २५२५१०१/०२/०३/०४/०६ , फॅक्स – ०२५० — २५२५१०७

---

विभाग :- जनगणना

सर्वसाधारण ठराव क्र. ९९ दिनांक :२२/०६/२०२६.

---

१) प्रस्तावाचा विषय :- जनगनणा-२०२७ च्या कामकाजाकरिता खर्चास प्रशासकीय व वित्तिय मंजूरी मिळणेबाबत.

२) संदर्भ :- जनगणना कार्य निदेशालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र. DCO- State Coordination/Census/२०२७/, दि. ०५/०१/२०२६.

३) अंदाजपत्रकीय रक्कम :- रु. १४,४३,१४,५४०/-

४) कामाची आवश्यकता :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील जनगणना-२०२७ च्या घरयादी व लोकसंख्या गणना अशा दोन चरणांसाठी नियुक्त करण्यात आलेल्या फिल्ड ट्रेंनर , प्रगणक, पर्यवेक्षक यांचे प्रशिक्षण, इतर अधिका-यांचे व कर्मचा-यांचे राज्य सरकार / भारत सरकार यांनी निश्चित केलेल्या मानधनाचा खर्च खालील तपशिलात दर्शविण्यात आले आहे.

५) कामाचे स्वरूप :- १) टप्पा क्र. - ०१ घरयादी आणि घरगणना (HLO).
२) टप्पा क्र.- ०२ लोकसंख्या गणना (PE).

६) अर्थसंकल्पीय तरतुद :- अ) जनगणना व आर्थिक गणना खर्च.
ब) ११००.०० लक्ष.

| Sr. No. | Desigation / Particular | Payment For Services | Training Charges | | Person | Day | Item Description | Quantity | Rate (Incl. off all taxes | Total |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Training | Lunch | | | | | | |
| | | | | | **टप्पा क्र. ०१** | | | | | |
| 1 | Technical Asst. | 25,000 | - | - | 11 | - | - | 10 month | | 2750000 |
| 2 | Multi Tasking Staff | 18,000 | - | - | 1 | - | - | 10 month | | 180000 |
| 3 | Master Trainers | - | 1800 | - | 1 | - | -- | 3 Batchs | | 5,400 |
| 4 | Field Trainers | - | 1000 | - | 91 | 15 | - | - | - | 1365000 |
| 5 | Supervisors | - | 400 | 200 | 717 | 3 | - | - | - | 1290600 |
| 6 | Enumerators | - | 400 | 200 | 4298 | 3 | - | - | - | 7736400 |
| 7 | Supervisors | 9,000 | - | - | 717 | - | - | - | - | 6453000 |
| 8 | Enumerators | 9,000 | - | - | 4298 | - | - | - | - | 38682000 |
| 9 | Training Expense | 7500 | - | - | - | - | - | 120 Batchs | - | 900000 |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 10 | Laptop | - | - | - | - | - | Intel Core i5 13th Gen 1334U - (8 GB/512 GB SSD/Windows 11 Home) (15.6 Inch, + MS Office 2024) | 12 | 81599 | 9,79,188 |
| 11 | Monocrome printer | - | - | - | - | - | A4 Black and White Laser Jet Printer, Copy/Print speed: 18 / 22 Prints Per Minute, Print Size: A4, FS & Legal by Cassette, Paper Capacity: 300 Sheets 1 Cassette Interface usb, 3 years on-site warranty | 12 | 16996 | 2,03,952 |
| **टप्पा क्र. ०१ एकुण खर्च (अ)** | | | | | | | | | | **60545540** |
| **टप्पा क्र. ०२** | | | | | | | | | | |
| 12 | Principal Census Officer | 60,000 | - | - | 1 | - | - | - | - | 60,000 |
| 13 | City Census Officer | 45,000 | - | - | 1 | - | - | - | - | 45,000 |
| 14 | Charge Officer | 45,000 | - | - | 9 | - | - | - | - | 4,05,000 |
| 15 | Add. Charge Officer | 45,000 | - | - | 9 | - | - | - | - | 4,05,000 |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 16 | Census Clerk Of Charge Officer | 30,000 | - | - | 9 | - | - | - | - | 2,70,000 |
| 17 | Technical Asst. | 25,000 | - | - | 11 | - | - | 8 month | - | 2200000 |
| 18 | Multi Tasking Staff | 18,000 | - | - | 1 | - | - | 8 month | - | 144000 |
| 19 | Supervisors | 16,000 | - | - | 717 | - | - | - | - | 11472000 |
| 20 | Enumerators | 16,000 | - | - | 4298 | - | - | - | - | 68768000 |
| **टप्पा क्र. ०२ एकुण खर्च (ब)** | | | | | | | | | | **83769000** |
| **एकुण (अ) + (ब)** | | | | | | | | | | **144314540** |

वसई विरार शहर महानगरपालिकेतील मुख्यालयासह ९ ( चार्ज ) प्रभाग समिती अंतर्गत जनगणना कामकाजासाठी जनगणना कार्य निदेशालय, महाराष्ट्र , यांचेकडून मनपा जनगणना निधी खाते क्र.- ६०३५५८७५३२५ मध्ये दि. ०५/११/२०२० रोजी रु. ४६,२५,६००/- रककम वर्ग झाली असून जनगणना-२०२७ चा प्राथमिक खर्च सदर निधीतून केला जाईल, उर्वरीत जनगणना खर्चासाठी वेळोवेळी शासनाकडून निधी मनपा बँक खाती वर्ग होणार आहे.जर सदर निधी शासनाकडून उपलब्ध न झाल्यास किंवा उपलब्ध होण्यास विलंब झाल्यास सदर खर्च मनपा निधीतुन खर्च करून झाल्यानंतर त्या खर्चाचे समायोजन करण्यास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेकरिता तसेच मा. स्थायी समिती सभेपुढे वित्तीय मान्यतेसह मंजूरी मिळावी.

ठराव / निर्णय :-

वसई विरार शहर महानगरपालिकेतील मुख्यालयासह ९ ( चार्ज ) प्रभाग समिती अंतर्गत जनगणना कामकाजासाठी जनगणना कार्य निदेशालय, महाराष्ट्र , यांचेकडून मनपा जनगणना निधीत प्राप्त होणा-या निधीस अधीन राहून टप्पा क्र. ०१ चा खर्च रक्कम रु.६,०५,४५,५४०/- आणि टप्पा क्र. ०२ चा खर्च रक्कम रू. ८,३७,६९,०००/- असा एकुण होणारा अंदाजित रक्कम रु. १४,४३,१४,५४०/- ( अक्षरी- चौदा कोटी त्रेचाळिस लक्ष चौदा हजार पाचशे चाळीस मात्र )आहे.जर सदर निधी शासनाकडून उपलब्ध न झाल्यास किंवा उपलब्ध होण्यास विलंब झाल्यास सदर खर्च मनपा निधीतुन खर्च करून झाल्यानंतर त्या खर्चाचे समायोजन करण्यास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे.

---

सुचकाचे नाव :- प्रफुल्ल साने

स्वाक्षरी :-

अनुमोदकाचे नाव :- मनोज पाटील

स्वाक्षरी :-

अनुकुल संख्या ----------- - -----------प्रतिकुल संख्या----------- - -----------तटस्थ संख्या----------- - -----------

( ठराव / सर्वानुमते / ~~बहुमताने~~ / मंजूर / ~~नामंजूर~~ )

(अजीव पाटील )
महापौर तथा पिठासीन अधिकारी
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय विरार (प.)
## मा.सर्वसाधारण सभा

**मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र. ७२** **सभा सुचना क्र. ०९** **सभा दिनांक.२२/०६/२०२६**

---

**प्रस्तावाचा विषय :-** सन २०२६-२७, सन २०२७-२८ व सन २०२८-२९ या त्रैवार्षीक वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात "शहर सौदर्यीकरण व स्वच्छता स्पर्धा २०२२" अंतर्गत शहर सौदर्यीकरण करण्यात आलेल्या मध्यवर्ती चौक, शिल्पे, कारंजे, वारसा स्थळे, GVP इ. यांची दैनंदिन दुरुस्ती करणेकामी प्रशासकिय व वित्तीय मान्यता देऊन ई-निविदा कार्यप्रणालीद्वारे बी-२ निविदा दर मागविणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकूर :-** सन २०२६-२७, सन २०२७-२८ व सन २०२८-२९ या त्रैवार्षीक वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात "शहर सौदर्यीकरण व स्वच्छता स्पर्धा २०२२" अंतर्गत शहर सौदर्यीकरण करण्यात आलेल्या मध्यवर्ती चौक, शिल्पे, कारंजे, वारसा स्थळे, GVP इ. यांची दैनंदिन देखभाल व दुरुस्ती करणे कामी महाराष्ट्र शासन यांचेकडील "शहर सौदर्यीकरण व स्वच्छता स्पर्धा २०२२" अंतर्गत शहर सौदर्यीकरण करणेकामी शासन निर्णय प्राप्त झाला आहे. त्या अनुषंगाने वसई विरार शहर महानगरपालिकेमार्फत खालील नमूद ठिकाणी मध्यवर्ती चौक, शिल्पे, कारंजे इत्यादी कामे पुर्ण करण्यात आलेली आहेत. तसेच काही ठिकाणी कामे सुरु आहेत. सदर कामांची दैनंदिन देखभाल दुरुस्ती वेळोवेळी करणे आवश्यक आहे. जेणेकरुन खालीलप्रमाणे उभारण्यात आलेले मध्यवर्ती चौक, शिल्पे, कारंजे, वारसा स्थळे, GVP इत्यादी ठिकाणे सुस्थिती अवस्थेत राहतील.

| अ.क्र. | प्रभाग समिती | सुशोभित करण्यात आलेले मध्यवर्ती चौक, शिल्पे व GVP चे ठिकाणे | क्षेत्रफळ (चौ.मी.) |
|---|---|---|---|
| १ | ए | आय लव बोळिंज सेल्फी पॉईट, प्रभाग समिती ए | ३८ चौ.मी. |
| २ | बी | सॉलीटेअर कारंजे | ३५ चौ.मी. |
| ३ | | कारगिल नगर, रिक्षा स्टॅण्ड | ८ चौ.मी. |
| ४ | | प्रणब कन्या स्कूल, नालासोपारा (पू) | ४८ चौ.मी. |
| ५ | | सितारा बेकरी जवळ, नालासोपारा (पू) | २२ चौ.मी. |
| ६ | | हनुमान मंदीर, मोरेगांव रोड | ६ चौ.मी. |
| ७ | | तोंडारे हॉस्पिटल जवळ, विरार (पू) | १०४ चौ.मी. |
| ८ | | रॉक गार्डन, मोरेगाव | १० चौ.मी. |
| ९ | | नालासोपारा (पुर्व) ओसवाल नगरी उद्यान | ३६० चौ.मी. |
| १० | | सिटी हॉस्पिटल जवळ | १० चौ.मी. |
| ११ | | तोंडारे हॉस्पिटल जवळ शिल्प विरार (पू) | ११० चौ.मी. |
| १२ | सी | भालचंद्र काशिनाथ चौक, प्रभाग समिती सी | १० चौ.मी. |
| १३ | | विर सावरकर चौक, प्रभाग समिती सी | २५ चौ.मी. |
| १४ | | फुलपाखरु शिल्प, डीजी-१ जवळ, प्रभाग समिती सी | १५ चौ.मी. |
| १५ | | आय लव विरार सेल्फी पॉईट, गणपती मंदीर, प्रभाग समिती सी | ४५ चौ.मी. |
| १६ | | साने गुरुजी तलाव | ५७ चौ.मी. |

| | | | |
|---|---|---|---|
| १७ | डी | नागेला तलाव चौक, नालासोपारा | ३२ चौ.मी. |
| १८ | | संकेश्वर नगर, गालानगर, नालासोपारा | २३ चौ.मी. |
| १९ | | फायर ब्रिगेड चौक (अग्रवाल चौक) वसई | ३१ चौ.मी. |
| २० | | राजनगर चौक, नालासोपारा (पु.) | १९ चौ.मी. |
| २१ | | वसंतनगरी गेट जवळील चौक | २३ चौ.मी. |
| २२ | | गालानगर सर्कल चौक | २६ चौ.मी. |
| २३ | | ब्राडवे चौक, नालासोपारा (पु.) | २१ चौ.मी. |
| २४ | | वसंतनगरी सर्कल, नालासोपारा (पु.) | ५८५ चौ.मी. |
| २५ | | वसंत नगरी मैदान जवळील कारंजे, नालासोपारा (पु.) | ३८ चौ.मी. |
| २६ | | आचोळे तलावालगत, नालासोपारा (पू) | ७ चौ.मी. |
| २७ | | नवघर, वसई (पु.) जलाराम बापु नगर, वसई (पु.) | ३० चौ.मी. |
| २८ | | नागेला तलाव, नालासोपारा (पू) | ७ चौ.मी. |
| २९ | ई | लक्ष्मीबेन छेडा मार्ग सर्कल | १७ चौ.मी. |
| ३० | | प्रभाग समिती ऑफीस (बी) निळेगाव | ४० चौ.मी. |
| ३१ | | ट्रीकंल गार्डनच्या समोर, पाटणकर पार्क | ८० चौ.मी. |
| ३२ | | वाघोबा मंदीर, निळेगांव | ४० चौ.मी. |
| ३३ | | ज्ञानेश्वर अपार्टमेंटच्या मागे, सोपारा गाव | ५० चौ.मी. |
| ३४ | | महात्मा फुले नगर, समेळपाडा | ३० चौ.मी. |
| ३५ | | वृंदावन गार्डन, फाऊंटन | १०० चौ.मी. |
| ३६ | | बुऱ्हाण चौक GVP | ५० चौ.मी. |
| ३७ | | चंदन नाका, नालासोपारा सर्कल | १७ चौ.मी. |
| ३८ | | अलकापुरी GVP | ३० चौ.मी. |
| ३९ | | GVP स्पॉट, अलकापुरी रोड, नालासोपारा (प.) प्र.स. ई | ३० चौ.मी. |
| ४० | | चक्रेश्वर तलाव | १० चौ.मी. |
| ४१ | एफ | धुरी रिसोर्ट, सेल्फी पॉईट, प्रभाग समिती एफ | २४ चौ.मी. |
| ४२ | जी | जुचंद्र तलाव कारंजे, वसई | २८ चौ.मी. |
| ४३ | | रेंज ऑफिस कारंजे | १५४ चौ.मी. |
| ४४ | | वालीव फाटा (तारकेनगर) कारंजे | ६७ चौ.मी. |
| ४५ | | धुमाळनगर कारंजे | ८३ चौ.मी. |
| ४६ | | वालीव, विठ्ठल मंदीरासमोर | २० चौ.मी. |
| ४७ | | सातीवली जिल्हा परिषद शाळा | २६ चौ.मी. |
| ४८ | | धुरी इंडस्ट्रीजवळ, वालीव | ६९ चौ.मी. |
| ४९ | एच | बाभोळा चौक, वसई | १३ चौ.मी. |
| ५० | | मानवमंदीर सर्कल, वसई | १९ चौ.मी. |
| ५१ | | ६० फिट चौक, वसई | १० चौ.मी. |
| ५२ | | दिवाणमान चौक, वसई | १० चौ.मी. |
| ५३ | | १०० फुट रस्ता, कारंजे, वसई (प.) | ८२ चौ.मी. |
| ५४ | | कौलसिटी, वसई (प.) | ८८ चौ.मी. |
| ५५ | | शिल्प - मॅरेथॉन धावपट्टु, विशालनगर, वसई | १० चौ.मी. |
| ५६ | | शिल्प - पुस्तक, समाज उन्नती मंडळ | ९ चौ.मी. |
| ५७ | | शिल्प - हॅपीमॅन, मानव मंदीर | २६ चौ.मी. |
| ५८ | | वर्तक कॉलेज मागे लोहार दुकानाजवळ, वसई (प.) | २४ चौ.मी. |
| ५९ | | स्वामी नारायण मंदीर, वसई (प.) | ४१ चौ.मी. |
| ६० | | प्रिया बिल्डींगजवळ चुळणे, वसई (प.) | ३८ चौ.मी. |
| ६१ | | जि. प. शाळा चुळणे, वसई (प.) | १४८ चौ.मी. |
| ६२ | | पंचवटी मेणबत्ती | २९ चौ.मी. |
| ६३ | आय | शेतकरी सेल्फी पॉईट, ॲलॉसिस ज्युनिअर कॉलेज जवळ, पापडी | ४५ चौ.मी. |

| | | | |
|---|---|---|---|
| ६४ | | आय लव दत्तानी सेल्फी पॉईट, दत्तानी विलेज जवळ, प्रभाग समिती आय | ७ चौ.मी. |
| ६५ | | भंडारी GVP स्पॉट, स्मार्ट बाजाराच्या समोर | ५ चौ.मी. |
| ६६ | | चिमाजी अप्पा स्मारक | १८० चौ.मी. |
| ६७ | | बैल गाडी, GVP होळी | ३४ चौ.मी. |

## दुरुस्तीकरीता आवश्यक असलेल्या साहित्याचा प्रकार

| Sr. No. | Description |
|---|---|
| 1 | Providing, supplying and fixing LED Kerb Stone |
| 2 | Artificial plant of size 6 feet height and 1 feet height |
| | a) 6 feet height |
| | b) 1 feet height |
| 3 | Artificial Grass 40 mm thick |
| 4 | Acrylic Letter LED Sign Board (Size 1.20 m x 0.90 m) |
| 5 | For fountain (Specificatoins) |
| | All Item S.S 316 |
| | 1) Pipe Size 3"-( Pipe thickness -14 Gauge Nozzle Taping and Bending , Rounding, Buffing & polishing.) |
| | 2) S.S Stand, Hight 3 Feet |
| | 3) S.S 32mm Coupling Threaded |
| | 4) ½ "Brass Ball Valve |
| | 5) ½" Vertical Jet Brass Nozzle (75 mm Dia) |
| | 6) 10 HP submersible booster Pump |
| | 7) BMC, Approved automatic panel box with timer (water Proof) of Sufficient capacity for water fountain. |
| | 8)S.S screen filter |
| | a) 50 mm dia |
| | b) 75 mm dia |
| | 9) 90mm Brass vertical NRP (75mm) |
| | 10)18 watt. S.5 316, IP 68 RGB Led Light |
| | 11) R.F. Controller |
| | 12) S.M.P.S. controller For Led Light |
| | 13) 4 Sq. mm, 4 Core Flexible Cable (Polly cab) |
| | 14) 6 Sq.mm. 3 Core flexible submersible Cable |
| | 15) Drain Line Point And in line water connection point for tank cleaning |
| | 16) Centre jet nozzle brass |
| | 17) Non return valve (63 mm Dia) |
| | 18) 3 HP submersible boostar Pump |
| | 19) S.S 40mm Coupling Threaded |
| | 20) 40 mm Brass valve |
| | 21) 40 mm Brass foam jet nozzle |
| | 22) 40 mm Brass Ball joint |
| | 23) Dandelion S.S.2.5 feet Nozzle |
| | 24) 300 mm round brass ball 32 branches 25) with ½ " Threading and 4" inlet size |
| | 25) Nozzle Mounted 36 Watt, IP 68 RGB light (250 mm) |
| | 26) 36 Watt S.S, Spot Light IP 68 Rgb light (200 mm squre) |
| | 27) 40 mm ball joint brass |
| | 28) 1/2" Brass Umbrella Nozzle |
| | 29) S.S 25mm Coupling Threaded |
| | 30) Brass vertical foam jet Nozzle |

| | |
|---|---|
| | 31) ½ " mist Brass Nozzle |
| | 32) 7.5 HP submersible boostar Pump |
| | 33) 25 mm Brass valve |
| | 34) 25 mm Brass foam jet nozzle |
| | 35) 25 mm Brass Ball joint |
| | 36) S.S. 316, 4"x 8" feet header pipe with stand |
| | 37) ½" Vertical Jet Brass Nozzle (50mm Dia) |
| | 38) 40 mm ball Valve brass |
| | 39) 40 mm Cascate nozzle brss |
| | 40) 5 HP submersible boostar Pump |
| | 41) 36 Watt S.S, Spot Light IP 68 whight light (200 mm squre) |
| | 42) Non return valve (100 mm Dia) |
| | 43) Waterproofing |
| | 44) 50 mm G.I Pipe |
| | 45) Acrylic Paint |
| | 46) Oil paint |
| | 47) Preparing Shubery |
| | 48) Trees |
| | 49) 25 HP customise submersible pump |
| | 50) S.M.P.S 30 AMP |
| | 51) S.M.P.S 40 AMP |
| | 52) 15.HP customise submersible pump |
| | 53) 35 Square mm 3.5 corc cable |
| | 54) 2" High jet Brass Nozzel |
| | 55) 2"Ball joint Brass material |
| | 56) 2" Tulip Brass Nozzle |
| | 57) 28 Amp relay |
| | 58) 3 phase coil |
| | 59) 3 phase indicater AMP Meter |
| | 60) 1" Revolving Brass Nozzle |
| | 61) 1" Diamond cut Nozzel Brass |
| | 62) 1"umbrella Brass Nozzle |
| | 63) Stainless steel Railing |
| | 64) BMC, Approved automatic panel box with timer (water proof ) of sufficient capacity for water fountain (above 10 HP) |
| | 65) K Type wall light 6 watt |
| | 66) Led flood light Halogen 25 watt |
| | 67) Router for kerb light with adjustable voltage |
| | 68) Starter for Fountains |
| | 69)20 H.P.vertical monoblock submercible oil filledpump set,with 2 ball bearings,suction defuser for high discharge with ceramic mechanical seal ISI mark discharge 750 LPM at 30 mtr. Head & delivery size of 75 mm dia. |
| | 70)fully Automatic star/delta starter suitable for7.5 H.P. to 10 H.P. for 3 phase squirrel cage motor totally enclosed with overload and no volt relay complete erected on provided angle iron frame. |
| | 71)FPMCB 40A to 63A in provided distribution board as per specification no. SWSWR/MCB |
| | 72)TPN MCB 6A to 32A, C series in provided distribution board as per specification no. SW-SWR/MCB |
| | 73)DPMCB 6A to 32A, C- series (for motor/power) in provided distribution board as per specification no. SW-SWR/MCB |

| | |
|---|---|
| | 74)fuse bridges with base H.C. type fuse links 250/500 V. 100 Amps. erected on polished wooden block. |
| | 75) metal work in CRCA sheet including Iron work for supports with fabrication of boxes, panel boards, etc. including cutting, bending, drilling, welding, riveting, treated with anti- rust treatment and duly powder coated or painted with one coat of red lead paint and 2 coats of enamel paint complete |
| | 76) cement concrete foundation in 1:3:6 cement concrete, (20 to 25) mm. stone metal duly plastered with necessary curing for complete. (pole muffing or any other purpose). |
| | 77) Galvanised cast iron earth plate size 60 x 60 x 0.6 cms. complete with all materials, testing & recording the results as per specification no. EA-EP |
| | 78)LED underwater light fittings IP 68 suitable above 18 watts to 27 watts in pressure dia cast aluminum alloy housing and heat sink extruded with changing colours and surge protection device complete with specific colour |
| | 79)electronic driver for synchronized automatic light changing in red, green & blue colours for LED lights with logical controller for various changing patterns and remote control with surge protection device, short circuit & open circuit protection up to 650 watts |
| | 80) G.I. pipe above ground of 'C' class ERW of size 75/80 mm dia with necessary fittings complete as per specification no. FF-P |
| | 81) ISI mark G.I.pipe 50mm dia C' class at position with accessories as per specification no.CW-PLB/GP |
| | 82)GI pipe ring of 50mm dia Sleamless G.I.pipe "C" class with scutting bending, drilling, tapping and brazing of nozzle base complete 3 mtr. Dia. |
| | 83)GI pipe ring of 50mm dia Sleamless G.I.pipe "C" class with cutting bending, drilling, tapping and brazing of nozzle base complete 2.5 mtr. Dia. |
| | 84)GI pipe ring of 50mm dia Sleamless G.I.pipe "C" class with cutting bending, drilling, tapping and brazing of nozzle base complete 2 mtr. Dia. |
| | 85)50 mm dia. gun metal sluice valve at position with necessary materials complete. |
| | 86)S/E central nozzle 25 mm dia brass flexible 190 mm height |
| | 87)80 mm & 10 mm dia jet type nozzle brass flexible with ball joint. |
| | 88) iron, sheet metal work consisting of CRCA sheets, various sections of iron, plates, chequered plates, rods, bars, MS pipes, etc. for panel board or any other purpose with bending, cutting, drilling and welding complete erected at the position with necessary materials duly painted with one coat of red oxide and two coats of enamel paint to match the switchgears or as per directions |
| | 89) XPLE armoured cable 4 core 16 sq. mm. aluminium conductor with c ontinuous 5.48 sq. mm. (12 SWG) G.I. earth wire complete erected with glands & lugs, on wall/ trusses/pole or laid in provided trench/ pipe as per specificationno. CB-LT/A |
| | 90) XLPE armoured cable 4 core 4 sq. mm. copper conductor continuous 5.48 sq. mm. (12 SWG) G.I. earth wire complete erected with glands & lugs, on wall/ trusses/ pole or laid in provided trench/ pipe as per specification no. CB-LT/CU |
| | 91) XLPE armoured cable 3 core 6 sq. mm. copper conductor continuous 5.48 sq. mm. (12 SWG) G.I. earth wire complete erected with glands & lugs, on wall/ trusses/ pole or laid in provided trench/ pipe as per specification no. CB-LT/CU |

| | |
|---|---|
| | 92) (including excavation of suitable width & depth up to 90 cm) 50 mm outside dia. double wall corrugated pipes (DWC) of HDPE for enclosing cable below ground/road surface, to required depth complete. |
| | 93) Stainless steel wire mesh 2 mm for suction filter. |
| | 94) cast iron double flange NRV of size 75/80 mm dia complete as per specification no. FF VL/NR |
| | 95) unobtrusive circular float for fountain built to good standard in GRP(glass wool reinforced fiber glass) shell for complete corrossion resistance with four separate compartments each filled with closed cell low density polyeurathene foam which prevents the water entry 3.00 mtr dia and 0.4 mtr height |
| | 96) anchor of 50 kg with fixing cable and float of 5 mtr |
| | 97) 4 pole power contactor 440V 40A for time switch complete erected on wooden block/provided box, with necessary materials. |
| | 98) programmable digital almanac timer microcontroller based with real time clock to operate on derived switching "ON" & switching "OFF" street light as per daily sunset and sunrise respectively automatically having 4 digit LED continuous time display, relay output 230 V / 10A with 10 hrs battery backup and manual over drive facility capable to drive different capacity contactors timer erected in provided M.S. box in an approved manner. |
| | 99) XLPE armoured cable 4 core 50 sq. mm. aluminium conductor with continuous 5.48 sq. mm. (12 SWG) G.I. earth wire complete erected with glands & lugs, on wall/ trusses/pole or laid in provided trench/ pipe as per specification no. CB-LT/AL |
| | 100) stainless steel 304, 14 gauge 2.5 mtr length ,1mtr width , 1mtr height Issosceles tringle (waterproof) box for fountain build to good standard in SS star shape with Five separate compartments each filled with closed cell low density polyethylene |
| | 101) 25 H.P verticle submercible water filled pump set, head and delivery size of 80 mm dia (1500 LPM) |
| | 102) metal work in CRCA sheet including Iron work for supports with fabrication of boxes, panel boards, etc. including cutting, bending, drilling, welding, riveting, treated with anti- rust treatment and duly powder coated or painted with one coat of red lead paint and 2 coats of enamel paint complete. |
| | 103) stainless steel pipe ring of 50mm dia,14 gauge, 304 stainless steel pipe with cutting bending, drilling, tapping and brazing of nozzle base complete 6 mtr. Diamtr |
| | 104) stainless steel pipe ring of 50mm dia,14 gauge, 304 stainless steel pipe with cutting bending, drilling, tapping and brazing of nozzle base complete 5 mtr. Diamtr |
| | 105) 4 inches G.I header pipe with 2 mtr height & 4 x 2 inch width reducer with coupling for center nozzle ( C class Jindal 6 mm thick ) |
| | 106) stainless steel 304, 6mm thick, angle Octagon shape frame with cutting bending, drilling, tapping etc. (each Height 1 mtr & width 1 mtr) |
| | 107) stainless steel RGB LED light fitings IP 68 suitable 24 watts |
| | 108) fully automatic digital control pannel with digital timer 440 V junction box |
| | 109) stainless steel RGB LED light fitings IP 68 suitable 64 watts |

| | |
|---|---|
| | 110) automatic RGB colours for LED lights with logical controller for various changing patternsand remote control with surge protection device (SMPS) short circuit and open circuit protection up to 650 watts. |
| | 111) Supplying and erecting 50 mm dia. Brass valveat position with necessary materials complete. |
| | 112) 90 mm & 10 mm dia brass nozzle |
| | 113) 25 mm brass ball joint |
| | 114) 25 mm threaded coupling |
| | 115) cable 3 core 6 sq. mm. copper submersiblecable |
| | 116) XLPE armoured cable 4 core 4 sq. mm. copper conductor with continuous 5.48 sq. mm. (12 SWG) G.I. earth wire complete erected with glands & lugs, on wall/ trusses/pole or laid in provided trench/ pipe as per specification no. CB-LT/AL |
| | 117) 10 mm thick 0.5 mtr dia M/S flange with cutting bending, drilling, tapping etc. |
| | 118) stainless steel 304, 14 gauge 3 mtr stand for verticle submercible pump safety |
| | 119) stainless steel 304, 16 gauge 5 mtr jali for verticle submercible pump safety |
| | 120) MS anchor of 50 kg with fixing stainless steel chain 18 mtr |
| | 121) circular float for fountain built to good standard in GRP(glass wool reinforced fiber glass) shell for complete corrossion resistance with four separate compartments each filled with closed cell low density polyeurathene foam which prevents the water entry 4.00 mtr dia and 0.4 mtr height |
| | 122) circular float for fountain built to good standard in GRP(glass wool reinforced fiber glass) shell for complete corrossion resistance with four separate compartments each filled with closed cell low density polyeurathene foam which prevents the water entry 3.00 mtr dia and 0.4 mtr height |
| | 123) circular float for fountain built to good standard in GRP(glass wool reinforced fiber glass) shell for complete corrossion resistance with four separate compartments each filled with closed cell low density polyeurathene foam which prevents the water entry 5.00 mtr dia and 0.4 mtr height |
| | 124) GI pipe ring of 50mm dia Sleamless G.I.pipe "C" class with scutting bending, drilling, tapping and brazing of nozzle base complete 4 mtr.PDia. |
| | 125) GI pipe ring of 50mm dia Sleamless G.I.pipe "C" class with scutting bending, drilling, tapping and brazing of nozzle base complete 5mtr.Dia. |

वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मध्यवर्ती चौक, शिल्पे, कारंजे, वारसा स्थळे, GVP इत्यादी ठिकाणी दैनंदिन दुरुस्ती पुढील प्रमाणे करणे आवश्यक राहील.

१) वरील नमूद ठिकाणी लावण्यात आलेल्या झाडे व लॉन यांना वेळोवेळी पाणी घालणे, त्यांची कटींग करणे. झाडे/लॉन खराब झाल्यास मंजूर ठेकेदाराकडून पुर्ण लागवड करणे.

२) मध्यवर्ती ठिकाणी बसविण्यात आलेल्या कारंजे योग्य रित्या चालु आहेत की नाही याबाबतची वेळोवेळी खातरजमा करुन घेणे.

३) कारंजे बांधकामाकरीता बसविण्यात आलेल्या नॉझलची, फिल्टर व इत्यादी आवश्यक साहित्यांची वेळोवेळी साफसफाई करणे.

४) वरील नमूद ठिकाणी करण्यात आलेल्या विद्युत व्यवस्थेची वेळोवेळी खातर जमा करणे.

५) वरील नमूद ठिकाणी बसविण्यात आलेली साहित्ये नादुरुस्त अवस्थेत असल्यास त्यांची नोंद करणे व संबधीत सहा.आयुक्त ह्यांना कळविणे.

६) मध्यवर्ती ठिकाणी बसविण्यात आलेल्या कारंज्याच्या टाकीमधील पाण्याची व्यवस्था तपासणे व उपलब्ध करुन घेणे.

तसेच वरील नमुद ठिकाणांची दैनंदिन साफसफाई ही महानगरपालिकेच्या घनकचरा विभागाच्या सफाई कामगारांमार्फत करून घेतल्यास महानगरपालिकेस अतिरिक्त खर्चाचा भार सोसावा लागणार नाही. त्यामुळे वरील नमुद ठिकाणांची दैनंदिन साफसफाई ही महानगरपालिकेच्या घनकचरा विभागाच्या सफाई कामगारांमार्फत करून घेणे उचित ठरेल.

वरीलप्रमाणे अटी-शर्ती अंतर्भुत करुन विषयांकित कामी ई-निविदा मागविणे आवश्यक आहे.

सन २०२६-२७, सन २०२७-२८ व सन २०२८-२९ ह्या त्रैवार्षिक वर्षा करिता वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मध्यवर्ती चौक, शिल्पे, कारंजे, वारसा स्थळे, GVP इत्यादी ठिकाणी दैनंदिन दुरुस्ती करणेकामी रक्कम रु. ३,००,००,०००/- एवढा खर्च अपेक्षित आहे. सदर कामाचा खर्च त्या त्या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पीय तरतुद मधील "इतर मालमत्तांची दुरुस्ती रंगरंगोटी" या लेखाशिर्षअंतर्गत भागविण्यात येणार आहेत.

सदर कामी वेळोवेळी तरतुद मध्ये वाढ करून पुढील तीन सन २०२६-२७, सन २०२७-२८ व सन २०२८-२९ ह्या त्रैवार्षिक वर्षाकरीता ई-निविदा कार्यप्रणालीव्दारे इच्छुक अनुभवी पुरवठाधारकांकडून बी-२ निविदा दर मागविणे आवश्यक आहेत.

सन २०२६-२७, सन २०२७-२८ व सन २०२८-२९ ह्या त्रैवार्षिक वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मध्यवर्ती चौक, शिल्पे, कारंजे, वारसा स्थळे, GVP इत्यादी ठिकाणी दैनंदिन दुरुस्ती करणेकामी रक्कम रु. ३,००,००,०००/- इतका खर्च ३ वर्षासाठी अपेक्षित आहे.

सन २०२६-२७, सन २०२७-२८ व सन २०२८-२९ ह्या त्रैवार्षिक वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मध्यवर्ती चौक, शिल्पे, कारंजे, वारसा स्थळे, GVP इत्यादी ठिकाणी दैनंदिन दुरुस्ती करणेकामी त्या त्या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पात बांधकाम विभागामार्फत तरतुद करणेची तजवीज ठेवण्यात आलेली आहे.

तरी सन २०२६-२७, सन २०२७-२८ व सन २०२८-२९ ह्या त्रैवार्षिक वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मध्यवर्ती चौक, शिल्पे, कारंजे, वारसा स्थळे, GVP इत्यादी ठिकाणी दैनंदिन दुरुस्ती करणेकामी होणाऱ्या खर्चास मा. सर्वसाधारण सभेची प्रशासकीय व वित्तीय मंजूरी घेणे आवश्यक आहे.

तरी सन २०२६-२७, सन २०२७-२८ व सन २०२८-२९ ह्या त्रैवार्षिक वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मध्यवर्ती चौक, शिल्पे, कारंजे, वारसा स्थळे, GVP इत्यादी ठिकाणी दैनंदिन दुरुस्ती करणेकामी एकूण रक्कम रु. ३,००,००,०००/- इतक्या अपेक्षित खर्चास प्रशासकिय व वित्तीय मंजूरी मिळणेकरीताचा प्रस्ताव मान्यतेसाठी मा. सर्वसाधारण सभेपुढे ठेवणेस शिफारस असे.

ठराव :- सन २०२६-२७, सन २०२७-२८ व सन २०२८-२९ ह्या त्रैवार्षिक वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मध्यवर्ती चौक, शिल्पे, कारंजे, वारसा स्थळे, GVP इत्यादी ठिकाणी दैनंदिन दुरुस्ती करणेकामी एकूण रक्कम रु. ३,००,००,०००/- इतक्या अपेक्षित खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३ (क) अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत असून सदर कामी बी-२ निविदा दर मागविणेकरीता तसेच वरील नमुद ठिकाणांची दैनंदिन साफसफाई ही महानगरपालिकेच्या घनकचरा विभागाच्या सफाई कामगारांमार्फत करून घेणेकामी मा. सर्वसाधारण सभा मान्यता देत आहे.

---

सुचकाचे नाव :- प्रफुल्ल साने

सही :-

अनुमोदक :- प्रविण शेट्टी

सही :-

अनुकुल संख्या ---------------------- प्रतिकुल संख्या---------------------- तटस्थ संख्या--------------

(ठराव/ सर्वानुमते/~~बहुमताने~~/मंजूर/~~नामंजूर~~)

(अजिव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई विरार शहर महानगरपालिका

------------------------------------------------------------------------------------(आवश्यक नसेल ते खोडावे)

# वसई-विरार शहर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय विरार

### मा.सर्वसाधारण सभा

**सर्वसाधारण सभा ठराव क्र. १३** **सभा सुचना क्र. ९** **दिनांक : २२/०६/२०२६**

---

**विषय :- सन २०२६-२७, सन २०२७-२८ व सन २०२८-२९ ह्या त्रैवार्षिक वर्षाकरीता वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या बांधकाम, विद्युत व पाणीपुरवठा विभागामार्फत तसेच मनपाच्या पॅनलवरील तांत्रिक सल्लागारामार्फत तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकाचे शासकिय संस्थेमार्फत, खाजगी कंन्स्लटंट, इंजिनिअर्स ह्यांचेमार्फत तांत्रिक लेखापरिक्षण करुन, प्रमाणित करुन तपासणी अहवाल सादर करणेकामी प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.**

**ठराव / निर्णय :-** सदरच्या प्रस्तावावर सभागृहात चर्चा करण्यात आली. चर्चाअंती सदरचा प्रस्ताव स्थगित ठेवण्यात आला.

सुचक - प्रफुल्ल साने

अनुमोदक - मनोज पाटील

अनुकूल संख्या --------—------- प्रतिकुल संख्या--------—------- तटस्थ संख्या ---------—---------

ठराव/सर्वानुमते/~~बहुमताने~~/मंजूर/~~नामंजूर~~

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

# वसई-विरार शहर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय विरार
### मा.सर्वसाधारण सभा

**सर्वसाधारण सभा ठराव क्र. १४** **सभा सुचना क्र. ९** **दिनांक : २२/०६/२०२६**

---

**विषय :- केंद्र पुरस्कृत Urban Challenge Fund अंतर्गत Public Private Partnership (PPP) तत्त्वावर दोन प्रकल्प राबविण्यासाठी स्वारस्य अभिरुची (EOI) मागविण्यास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.**

वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये वेगाने नागरीकरण होत असून पाणीपुरवठा व सांडपाणी व्यवस्थापनावर मोठा ताण निर्माण झाला आहे. नागरिकांना शाश्वत व पर्यावरणपूरक सेवा उपलब्ध करून देण्यासाठी प्रगत पायाभूत सुविधा उभारणे अत्यावश्यक आहे.

केंद्र शासन पुरस्कृत अर्बन चॅलेन्ज फंड (UCF) योजना जाहिर केली असून भारत सरकार गृह निर्माण व शहरी व्यवहार मंत्रालय यांचेकडील दि.१५/०४/२०२६ च्या परिपत्रकानुसार Urban Challenge Fund संदर्भातील मार्गदर्शक सूचना जाहिर केल्या आहेत. सदर योजनेचा वित्तीय आकृतबंध पुढील प्रमाणे आहे.

| खाजगी भागीदारी (PPP/ Loan) | केंद्र शासन हिस्सा | राज्य शासन/ स्थानिक स्वराज्य संस्था |
|---|---|---|
| ५०% | २५% | २५% |

Urban Challenge Fund अंतर्गत वसई-विरार शहर महानगरपालिकेचे १) खोलसापाडा धरण स्त्रोतावरून ७८ द.ल.ली. पाणीपुरवठा योजना राबविणे तसेच २) आचोळे येथे तृतीय स्तरीय सांडपाणी प्रक्रिया केंद्र उभारणे हे दोन प्रकल्प निधी उपलब्धतेसाठी प्रस्तावित करण्याचे नियोजन आहे.

सदर प्रकल्प हे शास्वत शहरी पाणी पुरवठा विकास, पर्यावरण संरक्षण व पाणी पुर्नवापर यासाठी अत्यंत महत्वाचे आहेत.

Urban Challenge Fund योजनेच्या निकषानुसार ५०% खाजगी भागीदारी अथवा कर्ज उपलब्ध असलेबाबतचे पुरावे/ कागदपत्रे उक्त प्रकल्प अहवालांसोबत सादर करणे बंधनकारक असून त्यानंतरच सदर योजनेत सहभाग घेता येऊन निधी उपलब्ध होईल. करिता खाजगी भागीदारीतून उक्त दोन प्रकल्प राबविणे करीता विविध संस्था इच्छुक असल्याबाबत खात्री करणेकरीता स्वारस्य अभिरुची मागविणे आवश्यक आहे.

**PPP तत्त्वावर अंमलबजावणी :**

- सदर प्रकल्प Public Private Partnership (PPP) तत्त्वावर राबविल्यास :
- खाजगी क्षेत्रातील तांत्रिक व आर्थिक कौशल्याचा लाभ मिळेल.
- प्रकल्प वेळेत पूर्ण होण्यास मदत होईल.
- Urban Challenge Fund अंतर्गत निधी उपलब्ध होईल.

सदर दोन्ही प्रकल्प Public Private Partnership (PPP) तत्त्वावर राबविण्यासाठी पात्र व अनुभवी संस्थांकडून Expression of Interest (EOI) मागविण्याची कार्यवाही करण्यास वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या मा. सर्वसाधारण सभेची प्रशासकीय मान्यता आवश्यक आहे.

तरी Urban Challenge Fund अंतर्गत निधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने प्रस्तावित केलेले वरील दोन प्रकल्प Public Private Partnership (PPP) तत्त्वावर राबविण्याकरीता स्वारस्याची अभिरुची (EOI) मागविण्यास प्रशासकीय मान्यतेकरीता प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्याकीरता मंजूरीची शिफारस आहे.

**ठराव / निर्णय :-** वरिलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन हि सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

१. वसई-विरार शहर महानगरपालिकेचे १) खोलसापाडा धरण स्त्रोतावरून ७८ द.ल.ली. पाणीपुरवठा योजना राबविणे तसेच २) आचोळे येथे तृतीय स्तरीय सांडपाणी प्रक्रिया केंद्र उभारणे हे दोन प्रकल्प निधी उपलब्धतेसाठी Urban Challenge Fund अंतर्गत प्रस्तावित करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

२. Urban Challenge Fund अंतर्गत निधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने प्रस्तावित केलेले वरील दोन प्रकल्प Public Private Partnership (PPP) तत्त्वावर राबविण्याकरीता स्वारस्याची अभिरुची (EOI) मागविण्यास मान्यता देण्यात येत असून सकारात्मक प्रतिसाद न लाभल्यास याबाबत शासन मार्गदर्शक सुचनांनुसार आवश्यक निर्णय घेण्याकरीता मा. आयुक्त, वसई-विरार शहर महानगरपालिका यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

प्रफुल्ल साने

सुचक -

अनुमोदक - मनोज पाटील

अनुकूल संख्या ---------------- प्रतिकुल संख्या---------------- तटस्थ संख्या -------------------

ठराव/सर्वानुमते/~~बहुमताने~~/मंजूर/~~नामंजूर~~

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

# वसई-विरार शहर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय विरार
### मा.सर्वसाधारण सभा

**सर्वसाधारण सभा ठराव क्र. १५** **सभा सुचना क्र. ९** **दिनांक : २२/०६/२०२६**

---

**विषय :- वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "आय" कार्यक्षेत्रातील नायगांव कोळीवाडा येथे जलकुंभ बांधणे कामी तयार केलेल्या अंदाजपत्रकीय खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.**

अंदाजीत रक्कम :- **रू.१,१९,३४,९५१/-**

वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "आय" क्षेत्रातील नायगांव कोळीवाडा येथे भूतपुर्व नायगांव ग्रामपंचायत कार्यकाळापासून १ लक्ष लिटर क्षमतेचा उंच जलकुंभ होता. सदर जलकुंभाचे संरचनात्मक निरीक्षण केले असता प्राप्त अहवालानुसार सदर जलकुंभ C१ प्रवर्गात मोडत असल्याने निष्कासीत करण्यात आला आहे.

सद्य:स्थितीत नायगांव कोळीवाडा परिसरातील नागरीकांना उमेळा स्मशानभूमी येथील जलकुंभावरून पाणी पुरवठा करण्यात येत आहे. नायगांव कोळीवाडा जलकुंभावरून अंदाजे ५ ते ६ हजार लोकसंख्येस पाणी पुरवठा टप्प्या-टप्प्याने करण्यात येत होता. भविष्यातील वाढत्या लोकसंख्येचा विचार करता नव्याने उभारण्यात येणाऱ्या जलकुंभाची क्षमता ५ लक्ष लिटर इतकी असणे आवश्यक आहे. मात्र उपलब्ध असलेल्या जागेचा विचार करता सदर जागेत २.५ लक्ष लिटर क्षमतेचा जलकुंभ उभारणे शक्य आहे.

यापुर्वी सदर कामी रु.६९,५३,०९२/- किंमतीचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते व त्यास प्रशासकीय ठराव क्र. ८३५ दि.०४/०९/२०२४ अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली होती. याकामी प्राप्त लघुत्तम निविदा अंदाजपत्रकीय किंमतीच्या १२% जादा दराची असल्याने संबंधीतास वाटाघाटीच्या चर्चेसाठी आमंत्रीत केले त्यावेळी त्यांनी जलकुंभाच्या ठिकाणी पाईलिंग अंदाजे २० ते २२ मीटर इतकी खोली संभाव्य असल्याने बांधकाम खर्चात वाढ होणार आहे असे महानगरपालिकेस सांगीतले आहे. सदर १२% जादा दराची प्राप्त निविदा रद्द करण्यास व सदर अंदाजपत्रक दुरूस्ती करण्यास तसेच सदर काम जिल्हा वार्षिक योजनेतून प्रस्तावित करण्यास व जिल्हा वार्षिक योजनेतून मंजूर न झाल्यास महानगरपालिका निधीतून प्रस्ताव सादर करण्यास प्रशासकीय ठराव क्र. १४५१ दि.२९/१०/२०२५ अन्वये मान्यता प्राप्त आहे.

सद्यस्थितीत विभागाने म.जी.प्रा. व सा. बां. विभाग यांच्या सन २०२३-२४ च्या दरसूचीवर आधारीत रू.१,१९,३४,९५१/- चे सुधारीत अंदाजपत्रक तयार केले आहे. सदर काम "जिल्हा वार्षिक योजनेतून" प्रस्तावित केल्यास १००% अनुदान महापालिकेस उपलब्ध हाईल. "जिल्हा वार्षिक योजनेतून" (सर्वसाधारण) अंतर्गत स्थानिक स्वराज्य संस्थांकडील रु. १५.०० कोटी पर्यंतच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार शासन निर्णय दि.२२/०२/२०२२ अन्वये मा. जिल्हाधिकारी यांना प्रदान असून सदर कामास व खर्चाकरीता महापालिकेचा ठराव पारित करून मा. जिल्हाधिकारी, पालघर यांच्याकडे जिल्हा वार्षिक योजनेतून प्रशासकीय मान्यता व अनुदान उपलब्धतेकरिता प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे.

सदर खर्च "जिल्हा वार्षिक योजनेतून" उपलब्ध होणाऱ्या अनुदान निधीतून तसेच सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पातील पाणी पुरवठा , भांडवली खर्च "शहरांतर्गत जलकुंभ" या लेखाशिर्षावरून भागविणे शक्य होणार आहे.

वरिल कामास व सादर केलेल्या रू.१,१९,३४,९५१/- च्या सुधारीत अंदाजपत्रकास मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेची आवश्यकता आहे.

तरी वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "आय" कार्यक्षेत्रातील नायगांव कोळीवाडा येथे जलकुंभ बांधणे कामी तयार केलेल्या रू.१,१९,३४,९५१/- च्यासुधारीत अंदाजपत्रकास मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेस्तव सदरचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यास मंजूरीची शिफारस आहे.

**ठराव / निर्णय :-** वरिलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन खालील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

१. वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "आय" कार्यक्षेत्रातील नायगांव कोळीवाडा येथे २.५ लक्ष लीटर क्षमतेचा जलकुंभ बांधणे कामी तयार केलेल्या रू.१,१९,३४,९५१/- च्या सुधारीत अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

२. "जिल्हा वार्षिक योजनेतून" (सर्वसाधारण) अंतर्गत वसई-विरार शहर महानगरपालिकेस उक्त कामी १००% अनुदान उपलब्ध होण्यासाठी प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी पालघर यांचेकडे पाठविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३. "जिल्हा वार्षिक योजनेतून" उक्त कामास मान्यता प्राप्त न झाल्यास किंवा प्रस्तावास विलंब होणार असल्यास नागरीकांच्या पाणी पुरवठ्याच्या दृष्टीने महानगरपालिका निधीतून (नविन जलकुंभ बांधणे लेखाशिर्षा अंतर्गत) सदर काम हाती घेण्यात यावे.

४. याकामी ७ दिवसांची जाहिर ई-निविदा सुचना प्रसिध्दी करून निविदा मागविण्यास व अनुषंगीक खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

सुचक - प्रफुल्ल साने

अनुमोदक - मनोज पाटील

अनुकूल संख्या ---------------- प्रतिकुल संख्या---------------- तटस्थ संख्या --------------------

ठराव/सर्वानुमते/~~बहुमताने~~/मंजूर/~~नामंजूर~~

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

# वसई-विरार शहर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय विरार
### मा.सर्वसाधारण सभा

**सर्वसाधारण सभा ठराव क्र. १६** **सभा सुचना क्र. ९** **दिनांक : २२/०६/२०२६**

---

**विषय :- वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभागसमिती 'एच' कार्यक्षेत्रातील अंबाडी रोड दिवाणमान येथील स्विमींग पुलमध्ये विविध दुरुस्ती करणेकामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.**

मुळ अंदाजपत्रकीय रक्कम :- रु. १,४५,१७,२७७/-
सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कम :- रु. २,९३,४६,०१२/-
कामाची आवश्यकता :- प्रभाग समिती 'एच' कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. २३ अंतर्गत दिवाणमान अंबाडी रोड परिसरात तत्कालीन नगरपरिषद काळामध्ये स्विमींग पुल बांधण्यात आला आहे. सदर पुलावरील भागात शेडचे बांधकाम करणेत आलेले होते. सद्यस्थितीत शेडच्या पर्लिन व पाईप काही भागात गंजलेले आहेत व त्याच्या लोखंडी पट्टया बऱ्याच वेळा पडत होत्या. दि. १६ जुलै रोजी पाईपचा मोठा तुकडा पडलेला आहे. तद्नंतर स्विमींग पुलच्या शेडचे स्ट्रक्चरल ऑडीट करणे कामी मे. आयकॉन इंजिनिअर्स ह्यांना देण्यात आले होते. त्यानुसार दि. १८/०७/२०२४ रोजी प्रत्यक्ष पाहणी करून ऑडीट रिपोर्ट सादर केलेला आहे. सदर शेड कमकुवत झालेले असून टिकू शकत नाही. त्यामुळे जुने शेड बदलणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने सदर इमारतीच्या सुचविलेल्या दुरुस्तीचे अंदाजपत्रक तांत्रिक सल्लगार मे. एनगार्च ह्याचेकडून सदर कामाच्या रक्कम रु. १,४५,१७,२७७/- चे अंदाजपत्रक तयार करणेत आले होते. सदर अंदाजपत्रकास मा. आयुक्त तथा प्रशासक यांचेकडून ठराव क्र. १९३६, दि. ०३/०१/२०२५ ने आर्थिक व प्रशासकीय मान्यता घेणेत आली होती. त्यानुसार निविदा प्रक्रिया करून मे. निखिल शरद परब यांची १५.३०% कमी दराच्या निविदेस मा. आयुक्त तथा प्रशासक यांचे ठराव क्र. २४७८ दि. २०/०३/२०२५ ने संविदेस मान्यता घेणेत आली होती. ठेकेदारासोबत जा.क्र. वविशम/ बांध/ १८१४/ २०२५ दि. २७/०३/२०२५ ने करारनामा करून कार्यादेश देण्यात आलेला आहे. कार्यादेश दिलेनंतर ठेकेदाराने प्रत्यक्ष कामास सुरुवात करून Proflex Sheet चे शेडचे बांधकाम पुर्ण केलेले आहे. स्विमिंग पुल मध्ये अपघात होऊ नये यासाठी लहान मुलांचा पुल व मोठा पुल यामध्ये पोलिसांनी केलेल्या सुचनेनुसार रेलींग लावणे आवश्यक आहे. तसेच पुलमधील भागातील काही भागात ओलावा जाणवत असलेमुळे आतील भागात वॉटर प्रुफींग व टाईल्स लावणे आवश्यक आहे. पुलाच्या चारही बाजूने इमारती असल्यामुळे शिट लावणे व त्यासाठी आवश्यक ती लोखंडी फ्रेम बनवावी लागणार आहे. त्यानुसार स्विमिंग पुल सुरू करणेपूर्वी वॉटर प्रुफ प्लास्टर, फ्लोरींग टाईल्स, स्विमिंग पुल साईडसाठी पॉलिकार्बोनेट शिट पॅनल, स्ट्रक्चरल फ्रेम, पेव्हर ब्लॉक, ग्रिल गेट, इ. स्विमिंग पुल परिसरातील अतिरीक्त कामे करणे आवश्यक आहे. सर्व बाबींचे एकूण अंदाजपत्रक (A)रु. ६२,१०,५९१/- इतका खर्च अपेक्षित आहे तसेच कामामध्ये प्रत्यक्ष स्थळावरील परिस्थितीनुसार आवश्यक संरचनात्मक बदल करण्यात आले असून

ऑन-साइट प्रत्यक्ष मोजमापानुसार कामाच्या प्रमाणात वाढ झाल्याने मूळ अंदाजपत्रकीय रक्कमेत एकूण (B)रु. ५०,३८,८६२/- इतकी झाली आहे. सबब, सदर वाढीव रक्कम व सुधारित अंदाजपत्रकास मान्यता देण्याबाबत विचार व्हावा. अन्यथा वरील कामे पुर्ण करणेसाठी स्विमिंग पुल पुन्हा बंद करावा लागेल. त्यामुळे नागरीकांमध्ये रोष निर्माण होण्याची शक्यता आहे. सद्यस्थितीत स्विमिंग पुल सुरू करणेसाठी वरील वाढीव बाबींचा समावेश करणे आवश्यक आहे. यापूर्वी कामाची मुळ अंदाजपत्रकीय रक्कम रु. १,४५,१७,२७७/- इतक होती. एकूण अंदाजित खर्च रक्कम रु. २,९३,४६,०१२/- इतका अपेक्षित आहे. सदर अंदाजपत्रकीय खर्चास सुधारीत प्रशासकीय मंजुरी मिळाल्यास सदरचे काम मूळ ठेकेदाराकडून करून घेतल्यास त्वरीत कामास सुरुवात करता येईल. त्यामुळे लवकरच स्विमिंग पुल नागरीकांना उपलब्ध करून देता येईल.

कामाचे स्वरुप :- अंतर्गत कामे : शेड, अंतर्गत प्लास्टर, पेंटींग व फ्लोरींग टाईल्स इ.
वॉटर प्रुफ प्लास्टर, फ्लोरींग टाईल्स, स्विमिंग पुल साईडसाठी फॉलिकार्बोनेट शिट पॅनल, स्ट्रक्चरल फ्रेम, पेव्हर ब्लॉक, ग्रिल गेट, इ.

आर्थिक विश्लेषण :-

| | | |
|---|---|---|
| १) मुळ निविदा रक्कम(including tax) | :- | १,४५,१७,२७७/- |
| २) वाढीव रक्कम (A+B) | :- | १,१२,४९,४५३/- |
| 3) रॉयल्टी रक्कम | :- | ६४,६४५/- |
| 4) लॅब टेस्ट रक्कम | :- | ४२,५८५/- |
| ५) Electric work | :- | १०,१९,३७३/- |
| ६) एकूण (२ + ३ + ४ + ५) | :- | १,२३,७६,०५६/- |
| ७) Add GST १८% | :- | २२,२७,६९०.०८/- |
| ८) Add Labour & Work Insurance २% | :- | २,२४,९८९.०६/- |
| ९) एकूण वाढीव रक्कम रु. | :- | १,४८,२८,७३५.१४/- |
| १०) एकूण रक्कम रु. (१ + ९) | :- | २,९३,४६,०१२/- |

यापूर्वी सदर जागेवर
झालेल्या कामाचा तपशिल :- सदर जागेत ३ वर्षात कोणत्याही प्रकारचे काम झालेले नाही.
अर्थसंकल्पीय तरतूद :- अ) लेखाशिर्ष :-
ब) मूळ तरतूद :-

स्थावर मालमत्ता नोंदवही क्र. १२८ पृष्ठ क्र. अ.क्र. वर नोंद

तरी सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (अ) नुसार मा. सर्वसाधारण सभेसमोर प्रशासकीय व वित्तीय मान्यतेस्तव सविनय सादर.

**ठराव/निर्णय :-** प्रभाग समिती 'एच 'कार्यक्षेत्रातील अंबाडी रोड दिवाणमान येथील स्विमींग पुलमध्ये विविध दुरुस्ती करणे या विषयाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करणेत आली. वरील कामी तयार करणेत आलेल्या रु. २,९३,४६,०१२/- इतक्या रक्कमेच्या सुधारीत अंदाजपत्रकात ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे. त्यानुसार सदर कामाचे अंदाज पत्रकास आवश्यक तांत्रिक मंजूरी घेऊन सदरचे काम मुळ ठेकेदाराकडून करून घेण्यात यावे. तसेच ठेकेदारास काम पुर्ण करणेस मा. शहर अभियंता यांचे मंजुरीने मुदतवाढ देणेस ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देणेत येत आहे.

सुचक - प्रफुल्ल साने

अनुमोदक - प्रविणा शेट्टी

अनुकूल संख्या --------------- प्रतिकुल संख्या--------------- तटस्थ संख्या -------------------

ठराव/सर्वानुमते/बहुमताने/मंजूर/नामंजूर

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

**वसई-विरार शहर महानगरपालिका**
**मुख्य कार्यालय विरार**
**मा.सर्वसाधारण सभा**

**सर्वसाधारण सभा ठराव क्र. १७** **सभा सुचना क्र. ९** **दिनांक : २२/०६/२०२६**

---

**विषय :- महानगरपालिकेच्या विविध तदर्थ समित्यांवर उपसभापती पदी निवड होणाऱ्या पदाधिकारी यांना वाहन भत्ता मंजूर करणेबाबत.**

वसई विरार शहर महानगरपालिकेने सदर्भ क्र. १,२ व ३ अन्वये मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र. १३, दिनांक १९/०७/२०१६, मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र. ०९, दिनांक १४/०८/२०१७, मा. प्रशासकीय ठराव क्र. २१०३, दिनांक ०७/११/२०२३ व मा. प्रशासकीय ठराव क्र. २२०४, दिनांक ०२/०२/२०२६ अन्वये पदाधिकारी व अधिकारी वर्गास वाहन पुरवठा करण्याऐवजी वाहन प्रतिपूर्ती भत्ता देण्याचे ठरविलेले आहे. सदर ठरावांनुसार खालील पदाधिकारी व अधिकारी यांना पदनिहाय वाहन भत्ता मंजूर करणेत आलेला आहे. तो खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | अनुज्ञेय पदाधिकारी व अधिकारींची पदे | मंजूर भत्ता |
|---|---|---|
| १ | मा. महापौर | रू. ७५,०००/- |
| २ | मा. उप महापौर | रू. ६५,०००/- |
| ३ | मा. आयुक्त | रू. ७५,०००/- |
| ४ | मा. अति.आयुक्त | रू. ६५,०००/- |
| ५ | मा. परिवहन व्यवस्थापक | रू. ६५,०००/- |
| ६ | मा. सभापती स्थायी समिती | रू. ५५,०००/- |
| ७ | मा. विरोधी पक्ष नेता | रू. ५०,०००/- |
| ८ | मा. सभागृह नेता | रू. ५०,०००/- |
| ९ | मा. सर्व सभापती, (परिवहन सभापती, महिला बालकल्याण समिती सभापती व इतर सभापती) | रू. ४५,०००/- |
| १० | मा. उपआयुक्त | रू. ४५,०००/- |
| ११ | मा. मुख्य लेखा परिक्षक/मुख्य लेखा अधिकारी | रु. ४०,०००/- |
| १२ | मा. उप मुख्य लेखा परिक्षक/उप मुख्य लेखा अधिकारी | रु. ४०,०००/- |
| १३ | मा. उपसंचालक नगररचना | रु. ४५,०००/- |
| १४ | मा. शहर अभियंता | रु. ४५,०००/- |
| १५ | मा. कार्यकारी अभियंता | रु. ४५,०००/- |
| १६ | मा. नगर अभियंता | रु. ४५,०००/- |
| १७ | करमुल्य निर्धारक | रु. ४०,०००/- |
| १८ | उप-अभियंता/सहा.आयुक्त/प्र.सहा.आयुक्त/ नगरसचिव /वैद्यकिय आरोग्य अधिकारी व विभाग प्रमुख/ सर्व प्रभारी | रु. ४०,०००/- |
| १९ | शाखा अभियंता | रु. ४०,०००/- |

उपरोक्त तक्त्यातील पदाधिकारी व अधिकारी यांना वाहन प्रतिपूर्ती भत्ता अदा करण्या तयेत आहे. त्यापैकी मा. महापौर महोदय यांनी सद्य परिस्थितीत वाहन भत्ता घेण्याचे नाकारलेले आहे. संदर्भ क्र.१ मधील ठरावामध्ये **"वेळोवेळी आकृती बंधातील मंजूर विभागप्रमुख / अधिकारी वर्गांची पदे ज्यावेळी भरण्यात येतील त्यावेळी मा. आयुक्त यांच्या मंजूरीने त्यांना वाहन प्रतिपुर्ती भत्ता देणेस मंजूरी देणेत येईल"** असे नमुद आहे.

त्यामुळे सदर ठरावानुसार नवीन पदांना वाहन भत्ता मंजूर करताना मा.आयुक्त महोदय यांना अधिकार प्रदान करणेत आलेले आहेत. परंतु, नवीन पदाधिकाऱ्यांना वाहन प्रतिपूर्ती भत्ता अदा करावयाचा असल्यास मा. आयुक्त महोदय यांना अधिकार प्रदान केलेले नाही असे ठरावाचे अवलोकन केले असता निदर्शनास येत आहे.

वसई विरार शहर महानगरपालिकेची नुकताच सार्वत्रिक निवडणूक पार पडलेली असुन सद्यस्थितीत महानगरपालिकेत सर्वसाधारण सभा अस्तित्वात आहे. तसेच मा. महिला बालकल्याण समिती व मा. आरोगय समिती या देखील अस्तित्वात आलेल्या आहेत. सदर समितींच्या मा. उप सभापती यांना वाहन प्रतिपूर्ती भत्ता उपरोक्त संदर्भिय ठरावांमध्ये मंजूर करण्यात आलेला दिसून येत नाही. करिता सदर पदास वाहन प्रतिपूर्ती भत्ता मंजूर करणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत मा. सभापती पदास र.रु ४५०००/- इतका भत्ता मंजूर आहे. करिता मा. उप सभापती पदास र.रु.४०,०००/- भत्ता अनुज्ञेय करणे उचित होईल. सदरचा खर्च **"पदाधिकारी वाहन भत्ता"** या लेखाशिर्षांतर्गत करता येईल.

तरी मा.उप सभापती या पदास र.रु.४०,०००/- प्रती माहे वाहन प्रतिपूर्ती भत्ता मंजूर करुन पुर्वलक्षीप्रभावाने यांना वाहन भत्ता अदा करावा किंवा कसे ? याबाबत योग्य त्या निर्णयास्तव प्रस्ताव आर्थिक व प्रशासकीय मंजुरीसाठी मा. सर्वसाधारण सभेपुढे सविनय सादर.

**ठराव / निर्णय :-** सदर प्रस्तावाचे सभेमध्ये वाचन करण्यात आले. वसई विरार शहर महानगरपालिका उप सभापती या पदास प्रती माहे र.रु. ४०,०००/- वाहन भत्ता अनुज्ञेय करुन सदर पदावर कार्यरत उप सभापती यांना पूर्वलक्षी प्रभावाने वाहन भत्ता अदा करणेस ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे.

सुचक - प्रफुल्ल साने

अनुमोदक - मनोज पाटील

अनुकूल संख्या --------------- प्रतिकुल संख्या--------------- तटस्थ संख्या -------------------

ठराव/सर्वानुमते/~~बहुमताने~~/मंजूर/~~नामंजूर~~

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

# वसई-विरार शहर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय, विरार
## मा.सर्वसाधारण सभा
## सभा सुचना क्र.०९

**सर्वसाधारण सभा ठराव क्र. १८** **दिनांक :२२/०६/२०२६**

..................................................................................................................................................................................

विषय :- वसई-विरार शहर महानगरपलिका कार्यक्षेत्रातील ज्येष्ठ नागरीक संघाना वार्षिक अनुदान देणेबाबतच्या धोरणास/योजनेस मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात अनेक ज्येष्ठ नागरिक संघ व त्यासाठी असलेल्या विरंगुळा केंद्रात कॅरम,बुध्दीबळ,म्युझिक सिस्टीम अशा सुविधा पुरविण्यात आल्याने या ठिकाणी निवृत्त झालेले अथवा ६५ वर्षापेक्षा अधिक वयोगटातील सर्व नागरीक ज्येष्ठ एकत्र येऊन राष्ट्रीय सण साजरे करणे,आरोग्य शिबिरे भरविणे,खेळांच्या स्पर्धा भरविणे असे अनेक कार्यक्रम करण्यात येतात.याकामी या वरिष्ठ नागरिक संघाना सभासद संख्येप्रमाणे वार्षिक २ लक्ष रुपयांपर्यत अनुदान देण्यासाठी मा.नारायण मानकर,माजी महापौर,वसई-विरार शहर महानगरपालिका यांनी दि.०६/०४/२०२६ रोजी कळविले आहे.सदर पत्रावर मा.महापौर महोदयांनी सदरहु विषय महासभेत घेणेबाबतचे निर्देश दिलेले आहेत.

यापूर्वी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६६ चे पोटकलम (२५) अन्वये शहरातील लोकांच्या दु:ख निवारण्यासाठी किंवा सार्वजनिक कल्याणसाठी उभारलेल्या कोणत्याही सार्वजनिक निधीस अंशदान देण्याची तरतूद असल्याने रक्कम मा.सर्वसाधारण सभा,ठराव क्र.८ दि.१८/०७/२०१३ अन्वये वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील वसई (पू.) सिनियर सिटीझन असोसिएशन,वसई (पू) जेष्ठ नागरिक कल्याणकारी संघ (रजि), वसई (प.) व जेष्ठ नागरिक संघ,नालासोपारा (पू) या तीन संस्थांना सन २०१३-१४ या वर्षाकरिता समाज उपयोगी कार्यक्रम यशस्वीरीत्या राबविण्यासाठी प्रत्येकी रक्कम रु.५१,०००/- वार्षिक अनुदान अदा करणेस मंजूरी देण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ नुसार महानगरपालिकेला जनकल्याण,सामाजिक सुविधा,नागरीक सुविधा,नागरीक कल्याण या नागरीकांच्या सामाजिक कल्याणासाठी ज्येष्ठ नागरिक सुविधा म्हणुन जेष्ठ नागरीकांसाठी आवश्यक असलेल्या योजना तयार करुन त्यांचा लाभ जेष्ठ नागरिकांना देणे आवश्यक आहे.या नुसार वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील जेष्ठ नागरिक संघासाठी स्वतंत्रपणे "ज्येष्ठ नागरिक संघ अनुदान योजना" राबविल्यास या योजनेचा लाभ ज्येष्ठ नागरिकांना होऊन त्यांना या योजनेच्या अनुदाना मधुन सामाजिक सहभाग,आरोग्य,सांस्कृतिक प्रोत्साहन व मानसिक स्वास्थ्य व कल्याणासाठी इ.समाजउपयोगी लोक कल्याणकारी आवश्यक उपक्रम राबविता येऊन त्यांना त्यांचे जीवनमान उंचावता येऊ

शकेल.महानगरपालिका कार्यक्षेत्रात अंदाजे १५ जेष्ठ नागरीक संघ असल्याचे समजते यासाठी खालील बाबी लक्षात घेऊन या योजनेची कार्यपध्दती निश्चित करणे आवश्यक आहे.

१) योजनेचे नाव :- "ज्येष्ठ नागरिक संघ अनुदान योजना"

२) योजनेची उद्दीष्टे :-

अ) ज्येष्ठ नागरिकांचे आरोग्य संवर्धन करणे.

ब) सामाजिक एकाकीपणा कमी करणे.

क) सांस्कृतिक,मानसिक कल्याणासाठी आवश्यक उपक्रमांना चालना देणे.

ड) ज्येष्ठ नागरिकांसाठी मार्गदर्शन शिबिरे राबविणे.

ई) आरोग्य तपासणी,योग,ध्यान कार्यक्रम आयोजित करणे.

३) योजनेचे पात्रता निकष :-

अ) संस्था नोंदणीकृत असावी.
सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट/Public Trust ACT अंतर्गत

ब) संस्था किमान ३ वर्ष कार्यरत असावी.

क) महानगरपालिका हद्दीतील ज्येष्ठ नागरीकांसाठी असुन त्यांचे कार्यालय सुध्दा महानगरपालिका हद्दीत असावे.

ड) संस्थेत किमान २५ सदस्य असावेत.

ई) संस्थेनी मागील वर्षाचा सामाजिक/सांस्कृतिक,उपक्रम राबविलेबाबत अहवाल व फोटो सादर करावेत.

फ) संस्थेने मागील ३ वर्षाचे लेखापरीक्षण अहवाल सादर करावेत

ग) संस्थेच्या सभासद संख्याप्रमाणे अनुदान मर्यादा निश्चित केली जाईल.

ह) संस्थेला वर्षातुन एकदाच वार्षिक अनुदान देण्यांत येईल.

४)योजनेसाठी लागणारी आवश्यक संस्थेची कागदपत्रे :-

अ) संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत

ब) संस्थेचे पॅन कार्ड साक्षांकित प्रत

क) बॅंक पास बुकची साक्षांकित प्रत

ड) सभासदांची सदस्य यादी

ई) मागील ३ वर्षांचे ऑडीट रिपोर्ट

फ) मागील वर्षाचा सामाजिक/सांस्कृतिक उपक्रम अहवाल व फोटो.

ग) विहित नमुन्यातील अर्ज.

५)अंदाजपत्रकीय तरतुद :- सन २०२६-२७ या वित्तीय वर्षातील अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात खालीलप्रमाणे तरतुद करण्यांत आलेली आहे.

ज्येष्ठ नागरिकांसाठी मेमरी क्लिनिक/ज्येष्ठ नागरिकांसाठी काम करणाऱ्या नोंदणीकृत ज्येष्ठ नागरिक संस्था यांना वार्षिक अर्थसहाय्य,मनोरंजनात्मक साहित्य,क्रिडा साहित्य व इतर अनुषंगिक साहित्य पुरवठा करणे या लेखा सांकेतांक खाली रु.१ कोटी ४० लाख इतकी तरतुद करण्यात आलेली आहे.

६) प्रस्तावित अनुदान रक्कम :- संघाच्या सदस्य संख्ये प्रमाणे वार्षिक अनुदान निश्चित करणे आवश्यक आहे.

| सदस्य संख्या | प्रस्तावित वार्षिक अनुदान रक्कम |
|---|---|
| २५ ते ५० | रु.२५,०००/- |
| ५१ ते १०० | रु.५०,०००/- |
| १०१ ते १५० | रु.७५,०००/- |
| १५१ ते २०० | रु.१,००,०००/- |
| २०० च्या वरील | रु.२,००,०००/- |

७) महानगरपालिके कडुन देण्यात येणाऱ्या अनुदानाचा वापर /उपयोग :- प्राप्त होणारे अनुदान हे फक्त खालील कारणांसाठी वापरता येईल.

अ) आरोग्य शिबीरे/आरोग्य तपासणी शिबीरे.

ब) योग / व्यायाम साहित्य

क) वाचनालय साहित्य

ड) सांस्कृतिक कार्यक्रम

ई) ज्येष्ठ नागरिक मेळावे

८) योजनेसाठी अर्ज प्रक्रिया :-

अ) दरवर्षी जाहिरात प्रसिध्दी करणे व मनपाच्या संकेतस्थळावर देणे.
ब) ३० दिवसांत अर्ज मागविणे.
क) तपासणी समिती नियुक्त करुन या समितीकडुन छाननी करणे.
ड) पात्र यादी प्रसिध्द करणे मा.स्थायी समिती/मा.महासभा मंजुरी घेणे.
ई) संस्थेची लाभार्थी यादी संकेतस्थळावर प्रसिध्दी केली जाईल.

९) मंजुरी :-

अ) मंजुर करावयाच्या रक्कमेनुसार मंजुरी घेणे मा.आयुक्त/मा.स्थायी समिती/मा.महासभा

१०) योजनेसाठी प्रस्तावित तपासणी समिती नियुक्त करणे आवश्यक :-

अ) उपायुक्त-अध्यक्ष
ब) सहाय्यक आयुक्त-सदस्य
क) लेखाधिकारी – सदस्य
ड) उप-मुख्य लेखापरीक्षक –सदस्य
ई) विधी अधिकारी – सदस्य

११) उपयोगिता प्रमाणपत्र :-

संस्थेने अनुदान घेतलेनंतर या अनुदानातुन केलेल्या खर्चाचा अहवाल सी.ए द्वारे प्रमाणित केलेले उपायोगिता प्रमाणपत्र UC देणे (Utilization Certificate)पुढील ६ महिन्यात महानगरपालिकेकेडे सादर करणे आवश्यक राहील.

१२)योजनेच्याकामकाजात संघाने अनियमितता केल्यास किंवा उपयोगिता प्रमाणपत्र सादर न केल्यास पुढील कार्यवाही करणे आवश्यक :-

अ) संस्थेचे पुढील वर्षाचे अनुदान बंद करण्यात येईल.
ब) मागील वर्षीचे अनुदान रक्कम वसुली करणे आवश्यक राहील.यासाठी अनुदान वितरीत करतेवेळी संबंधित संस्थेने याबाबतचे प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक राहील.
क) संबंधित संस्थेस काळ्या यादीत समावेश करुन महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर नोंदविण्यात येईल

तरी वरील कार्यपध्दतीनुसार "ज्येष्ठ नागरिक संघ अनुदान योजना" ही महानगरपालिका कार्यक्षेत्रातील ज्येष्ठ नागरिकांच्या कल्याणासाठी (लोककल्याणकारी वार्षिक अनुदानाची योजना) असल्याने सदर योजना राबविणेकामी धोरणात्मक निर्णयाची आवश्यकता असल्याने सदरचा विषय मा.महासभेसमोर ठेवण्यास शिफारस आहे.

**ठराव :-** वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील ज्येष्ठ नागरीक संघाना वार्षिक अनुदान देणेबाबतच्या धोरणास/योजनेस मान्यता देणे बाबतच्या विषयावर सभागृहात सविस्तर चर्चा करण्यात आली असून वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील ज्येष्ठ नागरीक संघाना वार्षिक अनुदान देणे बाबतच्या योजना प्रस्तावात नमूद केलेल्या कार्यपध्दती नुसार राबविण्यात यावी.याकरिता होणारा खर्च लेखाशिर्ष-ज्येष्ठ नागरिंकासाठी मेमरी क्लिनिक/ज्येष्ठ नागरिकांसाठी काम करणाऱ्या नोंदणीकृत ज्येष्ठ

नागरिक संस्था यांना वार्षिक अर्थसहाय्य,मनोरंनात्मक साहित्य,क्रिडा साहित्य व इतर अनुषंगिक साहित्य पुरवठा करणे यामधून भागविण्यात यावा.

यानुसार वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील ज्येष्ठ नागरीक संघाना वार्षिक अनुदान देणेबाबतच्या धोरणास/योजनेस धोरणात्मक मान्यता देण्यात येत आहे प्रस्तावात नमुद केलेल्या कार्यपध्दतीनुसार तपासणी समितीकडून प्रस्तावात नमुद कारणांसाठी व ज्येष्ठ नागरीक संघाच्या सदस्य संख्येप्रमाणे खालील तक्त्यात नमुद वार्षिक अनुदान मंजुर करण्यात यावे.

| **सदस्य संख्या** | **वार्षिक अनुदान रक्कम** |
|---|---|
| २५ ते ५० | रु.२५,०००/- |
| ५१ ते १०० | रु.५०,०००/- |
| १०१ ते १५० | रु.७५,०००/- |
| १५१ ते २०० | रु.१,००,०००/- |
| २०० च्या वरील | रु.२,००,०००/- |

सदरचे मंजूर अनुदान वितरीत करतेवेळी संबंधित संस्थेने उपयोगिता प्रमाणपत्र (Utilization Certificate) पुढील ६ महिन्यात सादर करण्यात येईल.संस्थेने अनुदान घेतलेनंतर या अनुदानातुन केलेला खर्चाचा अहवाल सी.ए द्वारे प्रमाणित केलेले उपयोगिता प्रमाणपत्र (Utilization Certificate) पुढील ६ महिन्यांत महानगरपालिके कडे सादर करणेंत यावे,सदर प्रमाणपत्र सादर न केल्यास पुढील वर्षाचे अनुदान बंद करणेत येऊन मागील वर्षाचे अनुदान रक्कम वसुली करणे,अन्यथा संबंधित संस्थेस काळ्या यादीत समावेश करुन महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर नोंदविण्यात येईल याबाबतचे प्रतिज्ञापत्र घेऊन मंजुर अनुदान संस्थेस वितरीत करण्यांत यावे याकामी येणाऱ्या संपूर्ण खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे.

सूचकाचे नाव :- प्रफुल्ल साने

अनुमोदकाचे नाव :- मनोज पाटील

अनूकूल संख्या ------------- प्रतिकुल संख्या -------------- तटस्थ संख्या-----------

ठराव/सर्वानुमते/बहुमताने/मंजुर/नामंजूर

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

…………………………………………………………………………………………

# वसई-विरार शहर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय विरार
### मा.सर्वसाधारण सभा

**सर्वसाधारण सभा ठराव क्र. १९ सभा सुचना क्र. ९ दिनांक : २२/०६/२०२६**

**विषय :- वसई-विरार शहर महानगरपालिका राबंवित असलेल्या विविध सामाजिक / सांस्कृतीक कार्यक्रमाकरीता १ एप्रिल ते ऑगस्ट २०२६ पर्यंत कार्यरत कंत्राटदारास मुदतवाढ तथा प्रलंबित देयके व माहे एप्रिल ते ऑगस्ट २०२६ पर्यंत नियोजित कार्यक्रमाकरीता सुधारीत प्रशासकीय / वित्तीय मान्यता तसेच वसई-विरार शहर महानगरपालिका राबवित असलेल्या विविध सामाजिक / सांस्कृतीक कार्यक्रमाकरीता सन २०२६-२८ ते सन २०२७-२८ करीता प्रशासकीय / वित्तीय मान्यता मिळणेबाबत.**

वसई विरार शहर महानगरपालिका मार्फत विविध सामाजिक, सांस्कृतीक कार्यक्रम, महापौर मॅरेथॉन, गणेश विसर्जन व्यवस्था, नवरात्रोत्सव, छटपूजा, वसई विजयोत्सव, कला क्रिडा महोत्सव, जिल्हा स्तरीय कला क्रिडा, महानगरपालिकेच्या विविध सभा, राष्ट्रीय कार्यक्रम, लोकार्पन कार्यक्रम इत्यादी राबविण्या साठी सन २०२३-२४ ते सन २०२५-२६ या कालावधी करीता ई-निविदा प्रसिध्दी करुन पॅनल पध्दतीने कामे देऊन उपरोक्त कार्यक्रम राबविण्यात आलेले आहे.

सदर निविदेची मुदत ३१ मार्च २०२६ ला संपलेली आहे. उपरोक्त कार्यक्रमाची प्रलंबीत देयके देणे व माहे १ एप्रिल २०२६ ते ऑगस्ट २०२६ पर्यंत नियोजीत कार्यक्रम राबविणेया करीता ५ कोटी पर्यंत खर्च अपेक्षित आहे. तरी अंदाजित खर्च रु. २० कोटीस सुधारीत प्रशासकीय / वित्तीय मान्यता घेणे आवश्यक आहे. तथा माहे ऑगस्ट २०२६ पर्यंत कार्यरत यंत्रणे मार्फत कामकाज करुन घेण्या करीता मुदतवाढ घेणे आवश्यक आहे.

उपरोक्त प्रमाणे कार्यक्रम राबविण्याकरीता सन २०२६-२७ ते सन २०२७-२८ या कालावधीसाठी ई-निवीदा काढण्यात येणार आहे. त्यासाठी प्रती वर्षी ५ कोटी प्रमाणे दोन वर्षाकरीता १० कोटीची आवश्यकता आहे. तरी सदर कालावधीत राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमाकरीता अंदाजित खर्च रु. १० कोटीस प्रशासकीय / वित्तीय मान्यता तथा निविदा प्रक्रीये करीता मान्यता घेणे आवश्यक आहे.

तरी उपरोक्त प्रमाणे प्रस्तावीत केल्यानूसार कार्यरत यंत्रणेला माहे ऑगस्ट २०२६ पर्यंत मुदतवाढ देणे व प्रलंबित देयके अदा करण्याकरीता रु. ०५ कोटीस सुधारीत प्रशासकीय / वित्तीय मान्यता देणे तसेच सन २०२६-२७ ते सन २०२७-२८ करीता रु. १० कोटीस प्रशासकीय / वित्तीय मान्यता तथा निविदा प्रक्रीया करण्याकरीता मान्यतेसाठी प्रस्ताव मा. सर्व साधारण सभेपूढे ठेवणेस शिफारस आहे.

**ठराव / निर्णय :-** वसई विरार शहर महानगरपालिका प्रशासनाच्या कामाकरीता सन २०२६-२७ व सन २०२७-२८ या वित्तीय वर्षासाठी मुख्यालय व प्रभाग समिती ए ते आय करीता स्टेज, मंडप, टेबल, पंखे, खुर्चा, पडदे, साऊंड सिस्टीम इत्यादी व्यवस्था भाडयाने पुरवठाकामी प्रति वर्ष रक्कम रु. ०४ कोटी प्रमाणे दोन वर्षाकरिता रक्कम रु. ०८ कोटीस खर्चास प्रशासकीय / वित्तीय मान्यता तथा निविदा प्रक्रीया करण्याकरीता आजची सभा प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहे.

सुचक - प्रफुल्ल साने

अनुमोदक - मनोज पाटील

अनुकूल संख्या ---------------- प्रतिकुल संख्या--------------- तटस्थ संख्या -------------------

ठराव/सर्वानुमते/बहुमताने/मंजूर/नामंजूर

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

# वसई-विरार शहर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय विरार
### मा.सर्वसाधारण सभा

**सर्वसाधारण सभा ठराव क्र. २०** **सभा सुचना क्र. ९** **दिनांक :२२/०६/२०२६**

---

**विषय :- सन २०२६-२७ या वित्तीय वर्षात महानगरपालिका हद्दीतील सर्व भाषिक शाळेतील (इंग्रजी माध्यम वगळून) शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता महानगरपालिका परिवहन सेवेचा वार्षिक मोफत पास योजनेकरिता महिला व बालकल्याण विभागामार्फत ५०% वित्तीय सहाय्य एस. एन. एन सर्व्हिसेस यांस अदा करणे व याकरिता येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.**

वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीत इंग्रजी माध्यमाच्या शाळा वगळता अस्तित्वात असलेल्या जिल्हा परिषद व खाजगी असंख्य विद्यार्थी शिक्षण घेत घेत आहेत. आपल्या घरापासून ते शाळापर्यंतचे अंदाजे २ ते ३ कि.मी. पर्यंतच्या अंतरावर विद्यार्थी दररोज पायपीट करीत असतात.शाळांपर्यंत जाणे-येणेसाठी सदर मार्गावर राज्य परिवहन बससेवा उपलब्ध होत नसल्याने, विद्यार्थ्यांना शाळेपर्यंतचा प्रवास पायी किंवा वेळेला खाजगी वाहनाने करावा लागतो. त्यामुळे विद्यार्थ्यांचे वेळेचा अपव्यय होत असून, त्याकामी विद्यार्थ्यांना आर्थिक भुर्दंड सोसावा लागतो. विद्यार्थ्यांच्या शालेय शिक्षणाची बाब महत्वपूर्ण आहे. वाहनांअभावी विद्यार्थ्यांची परवड होऊ नये.याकरिता सदर शाळांतून सदरच्या विद्यार्थ्यांना मोफत बस पास देण्याकामी संदर्भ क्र. १ नुसार मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.२० अन्वये धोरणात्मक निर्णयास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार विद्यार्थांना बस पास देणे योग्य होईल.या बाबीचा विचार करुन महानगरपालिका हद्यीतील सर्व भाषिक शाळेत (इंग्रजी माध्यम वगळून) शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना महानगरपालिका परिवहन सेवेचा महानगरपालिकेकडून ५०% दराने विद्यार्थ्यांकरिता मोफत पास योजना राबविल्यास मुलांच्या शैक्षणिक खर्चात मदत होऊन शाळा गळतीचे प्रमाण कमी होऊ शकते.

सन २०२१-२२ या वित्तीय वर्षापासून वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या परिवहन सेवेमध्ये मे एस.एन.एन सर्व्हिसेस यांना शहरातील बसेस BOOM तत्वावर चालविण्यास देण्यात आलेल्या आहेत. त्याअनुषंगाने वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील शालेय विद्यार्थ्यांना सन २०२५-२६ या वित्तीय वर्षात मोफत बस पास योजनेचा लाभ देण्याकामी संदर्भ क्र.२ च्या ठरावान्वये सन २०२५-२६ या वित्तीय वर्षाकरिता प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देण्यात आलेली आहे.

**ठाणे मनपा परिवहन सेवेमध्ये शालेय विद्यार्थ्यांना ५०% सवलत देण्यात येते.याधर्तीवर २०१६-१७ या वर्षापासून वसई-विरार शहर महानगरपालिकेमार्फत शालेय मुलांना ५०% दराने वार्षिक मोफत बस पास योजनेचा लाभ देण्याकामी मा.सर्वसाधारणसभा ठराव क्र. २०, दिनांक २०/०२/२०१६ अन्वये धोरणात्मक व कायमस्वरुपी राबविण्याबाबत मान्यता देण्यात आली आहे.**

**महाराष्ट्र शासन,नगर विकास विभाग यांचेकडील दिनांक.२९ मार्च, २०२२ शासन निर्णयामधील विवरणपत्र "ब" मध्ये त्या त्या महानगरपालिकेच्या आयुक्तांस शासन निर्णयात नमूद नसलेल्या बाबींव्यतिरिक्त नाविन्यपूर्ण योजनेचा समावेश करण्याचे स्वातंत्र्य मा.आयुक्त यांस देण्यात आलेले आहे तसेच त्यांनी विहित पध्दतीने मान्यता घेऊन या योजनांची अंमलबजावणी करण्याबाबत नमूद आहे.**

सन २०२५-२६ या वित्तीय वर्षात सदर योजनेकरिता विद्यार्थ्यांचे अर्ज स्विकारत असताना असे निदर्शनास आले की काही शाळेमधील विद्यार्थी महानगरपालिका हद्दीत राहत असून महानगरपालिका हद्दीतील शाळेत शिक्षण घेत आहेत मात्र त्या विद्यार्थ्यांन कडे असलेल्या आधारकार्ड व इतर कागदपत्रांवर महानगरपालिका हद्दी बाहेरील पत्ता असल्यामुळे अशा विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ देता आला नाही.सदर विद्यार्थी हे महानगरपालिका हद्दीत राहत असून सदर विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणुन महानगरपालिका हद्दीतील रहिवासी पुरावा नसलेल्या विद्यार्थ्यांना सदर योजनेचा लाभ देण्याबाबत योग्य निर्णय होणे आवश्यक आहे.

**योजनेची कार्यपध्दती:-**

१.वसई विरार शहर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर व प्रभाग समिती कार्यालया मध्ये विनामूल्य अर्ज उपलब्ध करुन देण्यात येतील.

२. विद्यार्थी महानगरपालिका हद्दीतील शाळेत शिकणारा असावा.

३. शाळा मराठी किंवा इतर भाषेतील असावी (इंग्रजी माध्यमाच्या शाळांना ही योजना लागू नसेल).

**योजनेचे लाभार्थी :-**

१.वसई विरार महानगरपालिका क्षेत्रातील सर्व भाषिक शाळेतील (इंग्रजी माध्यम वगळून) विद्यार्थी.

**अटी व शर्ती :-**

१.सदर योजना एकदा मंजूर झाल्यानंतर पुढे चालू ठेवणे किंवा बंद करणे किंवा किती लाभार्थ्यांना लाभ देणे,अर्ज स्विकारणे अथवा नाकारणे इ.बाबतीत सर्वस्वी महानगरपालिकेचा अधिकार अंतिम राहील.याबाबत कोणत्याही लाभार्थ्यांस कोणताही दावा / हक्कदारी दाखला करता येणार नाही किंवा त्याबाबतचा पत्र व्यवहार करता येणार नाही.

२.एक कुटूंबातील २ विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ घेता येईल.

३.पात्र लाभार्थीचे मुळ कागदपत्रांची तपासणी झाल्यानंतर अंतिम पात्रता निश्चित करण्यात येईल.

४.विद्यार्थ्यांनी शाळेत नियमित येणे आवश्यक आहे.

**अर्जासोबत सादर करावयाची आवश्यक कागदपत्रे व लाभार्थ्यांची पात्रता / निकष**

विहित नमुन्यातील अर्जासह खालील कागदपत्रांच्या छायंकित प्रती स्वसाक्षांकित करुन सादर कराव्यात.

१.विहित नमुना अर्ज.

२.अर्जदार वसई विरार महानगरपालिका हद्दीतील राहत असल्याचा पुरावा म्हणून रेशकार्ड/घरपट्टी/आधारकार्ड/लाईट बिल/भाड्याने राहत असल्यास भाडे कराराची प्रत यापैकी १ पुरावा.

३. स्वयंघोषणापत्र

४.शाळेची शिफारस

५.पासफोर्ट साईज फोटो विद्यार्थ्यांचा

या योजनेकरीता सन २०२५-२६ या वित्तीय वर्षात महानगरपालिका हद्यीतील विविध शाळेतील ४४२९ विद्यार्थ्यांकरिता वार्षिक बस पास वाटप करण्यात आले आहे.याकामापोटी जून,२०२५ ते एप्रिल,२०२७ पर्यंत मोफत बस पास योजनेकरिता रु.२,१८,७७,८६५/- इतकी रक्कम खर्च झाला आहे.त्यानुसार माहे जून,२०२६ ते एप्रिल,२०२७ या कालावधीत विद्यार्थ्यांना मोफत बस पास देण्याकामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| सन २०२५-२६ मध्ये जून २०२५ ते एप्रिल २०२६ पर्यंत होणार खर्च | सन २०२५-२६ मधील खर्चावर सन २०२६-२७ करिता १०% वाढीव रक्कम | सन २०२६-२७ मध्ये अंदाजित होणारा खर्च (जून २०२६ ते एप्रिल २०२७) |
|---|---|---|
| रु.२,१८,७७,८६५/- | रु.२१,८७,७८६/- | रु.२,४०,६५,६५१/- |

सन २०२६-२७ या वित्तीय वर्षात मंजूर झालेल्या अर्थसंकल्पातील लेखा सांकेतांक ७२२-२७४१ विद्यार्थ्यांसाठी मोफत बस पास योजना या लेखाशिर्षका अंतर्गत रु.३,७०,००,०००/- तरतूद करण्यात आली आहे. तरी सदर योजने करिता होणारा खर्च वरील प्रमाणे नमूद लेखाशिर्षकांतर्गत भागविण्यात येईल.

सन २०२६-२७ या वित्तीय वर्षात महानगरपालिका हद्दीतील सर्व भाषीक शाळेतील (इंग्रजी माध्यम वगळून) विद्यार्थ्यांना माहे जून, २०२६ ते एप्रिल, २०२७ वार्षिक मोफत बस पास देण्याकामी व याकरिता अंदाजे रक्कम रु.२,४१,००,०००/- (अक्षरी : दोन कोटी एकेचाळीस लक्ष रुपये मात्र) खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळण्याकामी मा.महासभेसमोर ठेवण्यास शिफारस आहे.

**ठराव / निर्णय** :- सन २०२६-२७ या वित्तीय वर्षात महानगरपालिका हद्यीतील सर्व भाषिक शाळेतील (इंग्रजी माध्यम वगळून) शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता महानगरपालिका परिवहन सेवेच्या वार्षिक मोफत पास योजनेकरिता महिला व बालकल्याण विभागामार्फत ५०% वित्तीय सहाय्य एस.एन.एन यांस अदा करणे याबाबतच्या विषयावर

सभागृहात सविस्तर चर्चा करण्यात आली असून वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील सर्व भाषिक शाळेत (इंग्रजी माध्यम वगळून) शिकत असणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना मोफत बस पास देण्यात यावे. याकरिता होणारा खर्च लेखाशिर्ष-विद्यार्थ्यांसाठी मोफत बस पास योजना, लेखा संकेतांक ७२२-२७४१ अंतर्गत भागविण्यात यावा. प्रस्तावा मध्ये नमूद केल्यानुसार योजनेच्या कार्यपध्दती, योजनेचे लाभार्थी, अटी व शर्ती, आवश्यक कागदपत्रे व पात्रता/निकष यानूसार योजना राबविण्यात यावी तसेच महानगरपालिका हद्दीत राहणाऱ्या ज्या विद्यार्थ्यां जवळ प्रस्तावात नमूद कागदपत्रांपैकी महानगरपालिका हद्दीतील रहिवासी पुरावे नसल्यास व महानगरपालिका हद्दी बाहेर राहत असुन महानगरपालिका हद्दीतील शाळेत शिकत असल्यास अशा विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक यांनी अशा विद्यार्थ्यांचा घराचा पत्ता व शाळे पर्यंतचे अंतर या दोन्ही बाबींचा समावेश असलेले शिफारस पत्र सही व शिक्या निशी दिलेनंतर अशा विद्यार्थ्यांना मुख्याध्यापकांनी दिलेल्या या शिफारशी नुसार मोफत बस पासचा लाभ देण्यात यावा तसेच या योजनेचा लाभएकाच कुटुंबातील जास्तीत जास्त 2 (दोन) विद्यार्थ्यांना दिला जाईल. तथापि, दुसऱ्या वेळेस जुळी अपत्ये जन्मास आल्यास, तिन्ही मुलांना लाभ दिला जाईल व नियमानुसार दत्तक घेतलेल्या सर्व पाल्यांनाही या योजनेचा लाभ अनुज्ञेय राहील. तसेच या कामी स्मार्ट कार्ड योजना तातडीने लागू करणेबाबतची कार्यवाही करणेत यावी.

याबाबत होणारे ५०% वित्तीय सहाय्य हे एस.एन.एन यांना अदा करणेस येऊन उर्वरीत ५०% भार हा एस.एन.एन यांनी स्वतः करावा यानुसार महानगरपालिका हद्दीतील सर्व भाषिक शाळेत (इंग्रजी माध्यम वगळून) शिकणाऱ्या विद्यार्थ्यां करीता माहे जून, २०२६ ते एप्रिल, २०२७ या कालावधीत वार्षिक मोफत बस पास देण्यात यावे याकामी येणाऱ्या संपूर्ण खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे.

सुचक - प्रफुल्ल साने

अनुमोदक - मनोज पाटील

अनुकूल संख्या --------------- प्रतिकुल संख्या--------------- तटस्थ संख्या -------------------

ठराव/सर्वानुमते/बहुमताने/मंजूर/नामंजूर

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

# वसई-विरार शहर महानगरपालिका
# मुख्य कार्यालय विरार
## मा.सर्वसाधारण सभा

**सर्वसाधारण सभा ठराव क्र. २१** **सभा सुचना क्र. ९** **दिनांक : २२/०६/२०२६**

---

**विषय :- भूमी अभिलेख कार्यालयाकरिता एक वर्षासाठी महानगरपालिकेचे बोळींज येथील जुने प्रभाग समिती कार्यालयाचा पहिला व दुसरा मजला कार्यालयीन कामाजासाठी भाडे तत्वावर देणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.**

महसुल व वन विभागाकडील शासन निर्णय क्र. आस्था/२०१७/५५५/ प्र.क्र.१०५/आस्था/६/दिनांक ११/०३/२२६ अन्वये वसई तालुका करीता नगर भूमापनअधिकारी, वसई व नगर भूमापन अधिकारी, विरार अशी दोन कार्यालये मंजूर करण्यात आली आहे. तरी सदर नगर भूमापन अधिकारी, वसई नगर भूमापन अधिकारी, विरार अशी दोन कार्यालये स्थापन करणेकामी वसई विरार महानगरपालिका कार्यालय क्षेत्रात दोन तयार इमारत उपलब्ध करुन देण्यात याव्यात अशी उप अधिक्षक भूमी अभिलेख, वसई यांनी दि.११/०५/२०२६ रोजीच्या पत्रान्वये मागणी केली आहे.

सदर मागणीच्या अनुषंगाने मा. अतिरिक्त आयुक्त यांच्या निर्देशानुसार दि.२७/०५/२०२६ रोजी उप अधिक्षक भूमी अभिलेख यांच्या समवेत स्थळ पाहणी करण्यात आली, पाहणी दरम्यान उप अधिक्षक भूमी अभिलेख वसई यांनी प्रभाग समिती ए, बोळिंज कार्यालयाच्या जुन्या इमारतीमधील दोन मजले त्यांच्या कार्यालयाकरीता सोईस्कर राहतील व त्यानुषंगाने सदर इमारतीमधील पहिल्या व दुसऱ्या मजल्याची मागणी केली आहे. सदर मागणीच्या अनुषंगाने गाव मौजे-बोळिंज येथील प्रभाग समिती ए, चे जुने कार्यालय उपलब्ध असून सदर इमारतीतील पहिला व दुसरा असे एकुण दोन मजले नगर भूमापन अधिकारी, वसई नगर भूमापन अधिकारी, विरार यांना दोन कार्यालये स्थापन करणेकरीता उपलब्ध करून द्यावयाचे झाल्यास खालील अटी-शर्ती नमुद करणे उचित ठरेल.

**<u>अटी-शर्ती</u>**

१. जागेचा ताबा हा केवळ शासकीय वापरासाठी देण्यात येत असून जागेवरील मालकी हक्क, भाडेपट्टा हक्क किंवा इतर कोणताही हक्क संबंधित कार्यालयास प्राप्त होणार नाही.

२. वीज, पाणी, दूरध्वनी, इंटरनेट, स्वच्छता, सुरक्षा रक्षक, वातानुकूलन यंत्रणा तसेच इतर उपयुक्तता सेवांवरील प्रत्यक्ष खर्च संबंधित कार्यालयाने स्वतंत्रपणे अदा करावयाचा राहील.

३. जागेचे कोणतेही संरचनात्मक बदल, अंतर्गत बांधकाम, रंगकाम, विभाजन, विद्युत जोडणीतील बदल किंवा अतिरिक्त सुविधा उभारण्यापूर्वी महानगरपालिकेची लेखी पूर्वपरवानगी घेणे आवश्यक राहील.

४. जागेचा वापर तृतीय पक्षास हस्तांतरित करणे, उपभाडे देणे अथवा इतर कोणत्याही संस्थेस वापरास देणे सक्त मनाई राहील.

५. कार्यालयीन कामकाजादरम्यान निर्माण होणारा कचरा, स्वच्छता व परिसराची देखभाल याची संपूर्ण जबाबदारी संबंधित कार्यालयाची राहील.

६. अग्निसुरक्षा, आपत्ती व्यवस्थापन व सुरक्षा विषयक सर्व नियमांचे पालन करणे संबंधित कार्यालयावर बंधनकारक राहील.

७. संबंधित कार्यालयाच्या निष्काळजीपणामुळे इमारत, साहित्य अथवा इतर मालमत्तेचे नुकसान झाल्यास त्याची भरपाई संबंधित कार्यालयाने करावी लागेल.

८. महानगरपालिकेस आवश्यक वाटल्यास अथवा सार्वजनिक हिताच्या कारणास्तव सदर जागेचा वापर परत घेण्याचा अधिकार राहील. अशा परिस्थितीत महानगरपालिकेकडून दिलेल्या सूचनेनंतर संबंधित कार्यालयाने निर्धारित मुदतीत जागा रिकामी करून ताबा परत द्यावा.

९. जागेचा वापर करताना सर्व लागू असलेले शासन निर्णय, नियम, अधिनियम, सुरक्षा मानके व महानगरपालिकेच्या निर्देशांचे पालन करणे बंधनकारक राहील.

१०.  जागा रिकामी करताना जागा मूळ स्थितीत, स्वच्छ व कोणत्याही अतिक्रमणाशिवाय महानगरपालिकेकडे सुपूर्त करणे आवश्यक राहील.

११.  वरील अटींचा भंग झाल्यास महानगरपालिकेस कोणतीही पूर्वसूचना न देता परवानगी रद्द करण्याचा अधिकार राहील.

तरी वरील अटी-शर्तीस अधिनराहून नगर भूमापनअधिकारी, वसई व नगर भूमापन अधिकारी, विरार यांना कार्यालय स्थापन करणेकामी प्रभाग समिती ए, बोळिंज कार्यालयाच्या जुन्या इमारतीतील पहिला व दुसरा मजला मा. भाडे व सुरक्षा ठेव निर्धारण समिती यांच्या मान्यतेस अधिन राहून उपलब्ध करुन देणेकामी शासनाच्या प्रचलित निर्णय व धोरणानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७९ क अन्वये मा.महासभेची प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेकामी पुढील निर्णयास्तव सविनय सादर.

**ठराव / निर्णय :-** प्रस्तावात नमुद अटी-शर्तीस अधिनराहून नगर भूमापन अधिकारी, वसई व नगर भूमापन अधिकारी, विरार यांना कार्यालय स्थापन करणेकामी प्रभाग समिती ए, बोळिंज कार्यालयाच्या जुन्या इमारतीतील पहिला व तिसरा मजला मा. भाडे व सुरक्षा ठेव निर्धारण समिती यांच्या मान्यतेस अधिन राहून उपलब्ध करुन देणेकामी शासनाच्या प्रचलित निर्णय व धोरणानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७९ क अन्वये पुढील कार्यवाहीस मा.महासभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

सुचक - प्रफुल्ल साने

अनुमोदक - मनोज पाटील

अनुकूल संख्या --------------- प्रतिकुल संख्या--------------- तटस्थ संख्या -------------------

ठराव/सर्वानुमते/~~बहुमताने~~/मंजूर/~~नामंजूर~~

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

# वसई-विरार शहर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय विरार
### मा.सर्वसाधारण सभा

**सर्वसाधारण सभा ठराव क्र. २२** **सभा सुचना क्र. ९** **दिनांक : २२/०६/२०२६**

---

**विषय :- वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील फेरीवाल्यांकडून वसूल करणेत येणाऱ्या बाजार कराबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.**

वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती ओ ते आय या प्रभाग समिती मध्ये विविध ठिकाणी आठवडे व दैनंदिन बाजार भरविले जातात.

वसई विरार शहर महानगरपालिकाचे प्रस्तावित दराची सन २०२०-२१ पासून अंमलबजावणी करण्यात आलेली आहे व हे दर पुढील ३ वर्षासाठी असून ३ वर्षानंतर बाजाराचे पूर्नविलोकन करुन दर प्रस्तावित करणेबाबत मा. स्थायी समिती सभा ठराव क्र.२, दि.०२/०५/२०२० अन्वये नमुद केलेले आहे. सदरचे प्रस्तावित दर व महानगरपालिकेचे संपूर्ण क्षेत्रफळ पाहता प्रस्तावित दर हे वसई विरार शहर महानगरपालिकेच्या लगत असलेल्या इतर महानगरपालिकेच्या तुलनेत अल्प प्रमाणात असल्याचे निदर्शनात आलेले होते. त्याबाबत इतर महानगरपालिकांकडून त्यांचे सद्याचे बाजार कराचे दर मागविण्यात आले होते. त्याबाबतचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| महानगरपालिकेचे नाव | उच्चतम दर | न्युनत्तम दर |
|---|---|---|
| भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका | रु. १००/- | रु. १५/- |
| मिरा-भाईंदर महानगरपालिका | रु. १००/- | रु. ७५/- |
| कल्याण डोंबिवली महानगरपालिका | रु. २००/- | रु. १०/- |
| पनवेल महानगरपालिका | रु. १००/- | रु. २५/- |

याबाबत ई-ऑक्शन पध्दतीने निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यात 7 निविदाधारकांनी भाग घेतला होता.

महानगरपालिकेचे संपूर्ण क्षेत्रफळ पाहता प्रस्तावित दर हे वसई विरार शहर महानगरपालिकेच्या लगत असलेल्या इतर महानगरपालिकांच्या तुलनेत अल्प प्रमाणात असल्याचे निदर्शनात आलेले आहे. सद्यस्थितीत वसई विरार शहर महानगरपालिकेचे निश्चित केलेले बाजार कराचे दर पुढील प्रमाणे आहेत.

| महानगरपालिकेचे नाव | उच्चतम दर | न्युनत्तम दर |
|---|---|---|
| वसई-विरार शहर महानगरपालिका | रु. १००/- + GST | रु. १०/- + GST |

सद्यस्थितीत बाजार कर वसुली हि जुन्याच दराने सुरु आहे. महानगरपालिकेच्या काही सन्माननिय सदस्यांनी तसेच सामाजिक कार्यकत्यांनी पत्रान्वये प्रस्तावित दैनंदिन बाजार करात कपात करावी अशी मागणी केली आहे.

वसई-विरार शहर महानगरपालिकेचे बाजार कर दर प्रस्तावित करताना महानगरपालिका क्षेत्रालगतच्या महानगरपालिकांच्या बाजार करांच्या दरांशी तुलना करण्यात आली होती. स्थानिक सन्मा. लोकप्रतिनिधी व सामाजिक कार्यकर्ते यांनी महापालिकेचे मंजुर प्रस्तावित दर हे लहान व्यावसायीक व सर्वसामान्य गरीब व्यावसायीक यांना न परवडण्यासारखे असुन त्यांच्यावर अन्याय झाल्यासारखे आहे असे त्यांच्यामार्फत प्राप्त झालेल्या पत्रामध्ये म्हटलेले आहे. प्राप्त पत्रांमध्ये बाजार कराचे दर कमी करण्याची मागणी करण्यात आलेली आहे. तसेच शहराची लोकसंख्या वाढलेली असून फेरीवाल्यांच्या संख्येत वाढ झाल्याने बाजार कर कमी केल्यास तुट भरून निघेल असे सन्मा. लोकप्रतिनिधी व सामाजिक कार्यकर्ते यांचे म्हणणे आहे. याबाबत आमची शिफारस नाही तथापी बाजार कराची रक्कम कमी करणे ही धोरणात्मक बाब असल्याने सदरचा प्रस्ताव माननिय महासभेपुढे निर्णयार्थ सविनय सादर.

**ठराव / निर्णय :-** वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील फेरीवाल्यांकडून वसूल करणेत येणाऱ्या बाजार कराबाबत विचार विनिमय करणेबाबतचा "बाजार कर विभागाच्या" प्रस्तावाचे वाचन सभेत करण्यात आले. सदर प्रस्तावावर साधक बाधक चर्चा करण्यात आली. चर्चेअंती द्विसदस्यीय समिती तयार करणेत येवून सदर समितीमध्ये श्री. प्रविण शेट्टी, स्थायी समिती सभापती व श्री. मनोज पाटील, विरोधी पक्ष नेते हे सदस्य असतील. या समितीने

१.बाजार कराचे दर काय असावे ?

२. फेरीवाल्यांचे क्षेत्र किती पाहीजे ?

३. बाजार कर कमीत कमी किती असायला पाहिजे आणि जास्तीत जास्त किती असायला पाहिजे ?

४. जंगलातून रानभाज्या वैगरे विकण्यासाठी येणाऱ्या आदिवासी बांधवांना हा कर माफ करता येईल का ?

५. आदिवासी बांधवांसाठी सकाळी एखादी जागा राखीव ठेवता येईल का ?

याबाबत अभ्यास करुन सदरचा अहवाल अंतिम मंजूरीसाठी सादर करावा असे सभागृहाने एकमताने ठरविले.

सुचक - प्रफुल्ल साने

अनुमोदक - मनोज पाटील

अनुकूल संख्या --------------- प्रतिकुल संख्या--------------- तटस्थ संख्या -------------------

ठराव/सर्वानुमते/बहुमताने/मंजूर/नामंजूर

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

# वसई-विरार शहर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय विरार
### मा.सर्वसाधारण सभा

**सर्वसाधारण सभा ठराव क्र. २३** **सभा सुचना क्र. ९** **दिनांक : २२/०६/२०२६**

---

**विषय :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमा मधील तरतूदीनुसार सभा नियमावलीतील 'प्रस्तावाच्या सूचना' अंतर्गत महासभेच्या कामकाजाचे थेट प्रक्षेपण (Live Streaming) पुन्हा सुरू करण्याबाबत.**

**ठराव/निर्णय :-** महानगरपालिकेच्या महासभेच्या कामकाजाचे थेट प्रक्षेपण (Live Streaming) पुन्हा सुरू करण्याबाबत मा.विरोधी पक्ष नेते श्री. मनोज पाटील यांनी सादर केलेला प्रस्ताव सभागृहाने विचारात घेतला. सदर प्रस्ताव सभागृहाकडून बहुमताने नामंजूर करण्यात आला.

सुचक - डॉ. शुभांगी पाटील

अनुमोदक - अरुणा डाबरे

अनुकूल संख्या ---------६७------- प्रतिकुल संख्या---------४१------- तटस्थ संख्या ---------००---------

ठराव/~~सर्वानुमते~~/बहुमताने/मंजूर/~~नामंजूर~~

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

# वसई-विरार शहर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय विरार
### मा.सर्वसाधारण सभा

**सर्वसाधारण सभा ठराव क्र. २४** **सभा सुचना क्र. ९** **दिनांक : २२/०६/२०२६**

---

**विषय :- वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील नालेसफाई कामांची सद्यस्थिती. नाल्यांवरील अतिक्रमणे व संभाव्य पूरस्थितीबाबत तातडीने युद्धस्तरावर कार्यवाही करण्याबाबत.**

**ठराव/निर्णय :-** वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील नालेसफाई कामांची सद्यस्थिती. नाल्यांवरील अतिक्रमणे व संभाव्य पूरस्थितीबाबत तातडीने युद्धस्तरावर कार्यवाही करण्याबाबत मा. विरोधी पक्ष नेते यांनी मांडलेल्या प्रस्तावावर सर्वसाधारण सभेत सविस्तर चर्चा करण्यात आली. त्याअनुषंगाने, सर्वसाधारण सभेने महानगरपालिका क्षेत्रातील सर्व प्रमुख व उपनाल्यांची नालेसफाईची कामे तातडीने युद्धस्तरावर पूर्ण करण्यात यावीत. नाल्यांवरील अनधिकृत अतिक्रमणांची पाहणी करून, लागू असलेल्या कायदेशीर तरतुदीनुसार कारवाई करण्यात यावी. पूरपरिस्थिती निर्माण होणाऱ्या भागांचे सर्वेक्षण करून आवश्यक उपाययोजना करण्यात याव्या. त्याअनुषंगाने संबंधित विभागाने उपाययोजना केलेल्या आहेत व नसतील पुर्ण झाल्या त्या तातडीने पूर्ण करुन घ्याव्यात अशा सुचना सभागृहाकडून देण्यात आल्या.

सुचक - मनोज पाटील

अनुमोदक - डॉ. शुभांगी पाटील

अनुकूल संख्या ---–--- प्रतिकुल संख्या---–--- तटस्थ संख्या ---–---

ठराव/सर्वानुमते/~~बहुमताने~~/मंजूर/~~नामंजूर~~

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)

# वसई-विरार शहर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय विरार
## मा.सर्वसाधारण सभा

**सर्वसाधारण सभा ठराव क्र. २५** **सभा सुचना क्र. ९** **दिनांक : २२/०६/२०२६**

---

**विषय :- शहरातील फेरीवाल्यांच्या 'डिजिटल क्यूआर कोड' व बायोमेट्रिक नोंदणीद्वारे कर वसुली पद्धत लागू करण्याबाबत.**

**ठराव / निर्णय :-** वसई-विरार शहरातील फेरीवाल्यांच्या 'डिजिटल क्यूआर कोड' व बायोमेट्रिक नोंदणीद्वारे कर वसुली पद्धत लागू करण्याबाबत मा. सदस्य मार्शलीन चाको यांनी मांडलेल्या प्रस्तावावर सर्वसाधारण सभेत सविस्तर चर्चा करण्यात आली. चर्चेदरम्यान अशा प्रणालीमुळे फ़ेरीवाल्यांची अधिकृत नोंदणी, कर/परवाना शुल्काची पारदर्शक व डिजिटल पद्धतीने वसुली, महसूल गळतीस प्रतिबंध, अनधिकृत वसुलीवर नियंत्रण तसेच प्रशासकीय कार्यक्षमतेत वाढ होण्यास मदत होईल, असे मत व्यक्त करण्यात आले.

त्याअनुषंगाने प्रशासनाने 'डिजिटल क्यूआर कोड' व बायोमेट्रिक नोंदणीद्वारे कर वसुली पद्धत लागू करणेबाबत सर्व बाबी तपासून कार्यवाही करण्यास मान्यता दिली.

सुचक - मार्शलीन चाको (स्वाक्षरी)

अनुमोदक - मनोज पाटील (स्वाक्षरी)

अनुकूल संख्या ---------------- प्रतिकुल संख्या---------------- तटस्थ संख्या ------------------

ठराव/सर्वानुमते/~~बहुमताने~~/मंजूर/~~नामंजूर~~

(स्वाक्षरी)

(अजीव पाटील)
महापौर तथा
पिठासीन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

*(आवश्यक नसेल ते खोडावे)